# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २५ मार्च, २०२६ / चैत्र ४, १९४८ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(३)** | **इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धव्यवसाय विकास, दिव्यांग कल्याण, अपारंपारिक ऊर्जा मंत्री** | |
| **(४)** | **पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्ये मंत्री** | |
| **(६)** | **परिवहन मंत्री** | |

-----------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २७**

-----------------------------------------

## राज्यातील १३ जिल्ह्यांमधील प्रभारी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांना पदमुक्त केल्याबाबत

**(१) * ७७९४ श्री.शशिकांत शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांग कल्याण विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण यंत्रणेंतर्गत नागपूर, पुणे, सांगली, लातूर, अहिल्यानगर, सातारा, धाराशिव, जळगाव, वाशिम, धुळे, कोल्हापूर, परभणी व नाशिक या १३ जिल्ह्यांतील जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकाऱ्यांना शासकीय आदेश न देता तसेच पर्यायी नियुक्ती व्यवस्था न करता पदावरून हटविण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिकाऱ्यांना पदावरून हटविण्याबाबत शासन आदेश निर्गमित केला होता किंवा प्रशासकीय पुनर्रचनेच्या प्रक्रियेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कारवाईमुळे संबंधित जिल्ह्यांमध्ये दिव्यांग व्यक्तींना मिळणाऱ्या विविध योजना, प्रमाणपत्र प्रक्रिया, अनुदान वितरण, पुनर्वसन सेवा व सक्षमीकरण कार्यक्रम राबविण्याबाबत अडचणी येत असल्याच्या तक्रारी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी अथवा विभागीय आढावा घेवून त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांच्या पदस्थापना, पर्यायी नियुक्ती, सेवा सातत्य तसेच दिव्यांग लाभार्थ्यांना होणारा प्रशासकीय त्रास दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

दिनांक १५/१२/२०२२ च्या अधिसूचनेनुसार स्वतंत्र विभागाची निर्मिती झाली. शासन निर्णय, दिनांक १०/१०/२०२४ नुसार क्षेत्रिय स्तरावर निर्माण करण्यात आलेली पदे सेवाप्रवेश नियम तयार नसल्यामुळे रिक्त होती. क्षेत्रिय कार्यालयांसाठी नव्याने मंजूर पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करुन, संबंधित पदाचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला पाठवणे तसेच भरतीप्रक्रिया राबवून निवडप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बराच कालावधी लागण्याची शक्यता होती.

विभागाची क्षेत्रिय स्तरावर स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा नसल्याने, क्षेत्रिय कार्यालये सुरु करणे आवश्यक होते. त्यामुळे दिनांक १०/०१/२०२५ च्या पत्रान्वये प्रादेशिक दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी (एस १८/२०) व जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी (एस-१५) ही पदे प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच आदिवासी विकास विभागाकडून इच्छूकता मागविण्यात आली.

तथापि, प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी योग्य उमेदवार न मिळाल्याने विभागांतर्गत कार्यरत असलेले अधीक्षक (गट-ब) व वैद्यकिय सामाजिक कार्यकर्ता (गट-क) यांच्याकडे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी गट-ब या पदाचा अतिरिक्त कार्यभार तात्पुरत्या स्वरूपात सोपविण्यात आला व दिनांक १ मे २०२५ पासून १३ जिल्ह्यातील कार्यालये सुरु करण्यात आली.

तसेच दिनांक २५/०८/२०२५ च्या अर्धशासकीय पत्रान्वये प्रशासकीय कामकाजात एकसमानता रहावी, या उद्देशाने जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार नियमित नियुक्ती होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद अथवा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद किंवा अन्य गट-अ व गट-ब अधिकाऱ्यांकडे सोपविण्याचे निदेश देण्यात आले व दिनांक १/०९/२०२५ पासून जिल्हा कार्यालये सुरु करण्यात आली आहेत.
(३) व (४) हे खरे नाही.

दिनांक २५/०८/२०२५ च्या अर्धशासकीय पत्रान्वये जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार गट-अ व गट-ब अधिकाऱ्यांकडे सोपवून दिनांक १/०९/२०२५ पासून कार्यालये सुरु करण्यात आली आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत दिव्यांग व्यक्तींसाठीच्या योजना राबविण्यात येत असल्यामुळे लाभार्थ्यांना प्रशासकीय त्रास झाला नाही.

विभागाच्या सुधारित आकृतीबंधास मा.मंत्रीमंडळाने दिनांक २६/०२/२०२६ रोजी मान्यता दिली असून, सेवाप्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे. सेवाप्रवेश नियम तयार झाल्यावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरतीप्रक्रिया राबविण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भुसावळ (जि.जळगाव) शहरातील पान स्टॉल चालकावर गोळीबार प्रकरणी गुन्हेगारांवर कारवाई करण्याबाबत

**(२)** * **७९६९ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगांव) शहरातील जळगाव नाका परिसरात एका पान स्टॉल चालकावर अज्ञात व्यक्तींनी गोळीबार केल्याची घटना घडून परिसरात भीती व दहशतीचे वातावरण निर्माण झाल्याने तसेच अशा घटनांमुळे गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक उरलेला नसल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाल्याचे, दिनांक १७ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेप्रकरणी गुन्हा नोंदवून संबंधित आरोपींचा शोध घेणे, त्यांना तातडीने अटक करणे तसेच संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यासाठी पोलीस प्रशासनामार्फत कार्यवाही करण्यास विलंब झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी भुसावळ शहर व परिसरात गस्त वाढविणे, गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण आणणे व नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक १७/१२/२०२५ रोजी रात्री ०८.३० वाजेच्या सुमारास सदर गुन्ह्यातील फिर्यादी व त्यांचा मित्र भुसावळ येथील जळगांव नाक्याजवळील पान स्टॉलवर उभे असताना चार अनोळखी व्यक्तींनी फिर्यादी व त्यांचे मित्राला पिस्टलचा धाक दाखवुन पैसे व दागिने काढून देण्यास सांगितले. तेव्हा फिर्यादीने आरोपींना विरोध केला असता झटापट होवून आरोपीने एक गोळी झाडली असता फिर्यादी जखमी झाले. सदर घटनेच्या अनुषंगाने भुसावळ शहर पोलीस स्टेशन येथे दिनांक १८/१२/२०२५ रोजी CCTNS No. २८८/२०२५ BNS कलम ३११,३१२ सह आर्म ॲक्ट ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) गुन्ह्याच्या तपासात एकूण ४ विधी संघर्ष बालकांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदरच्या चार विधी संघर्ष बालकांपैकी तीन विधी संघर्ष बालक यांना दिनांक १८/१२/२०२५ रोजी ताब्यात घेण्यात आले असून मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे त्यांना बालसुधार गृह येथे निरीक्षणासाठी ठेवलेले होते. सद्य:स्थितीत मा.बाल न्याय मंडळ, जळगाव यांनी तीनही विधीसंघर्ष बालकांस मुक्त केले आहे.

तसेच सदरच्या गुन्ह्यातील उर्वीरत एका विधी संघर्ष बालकाचा शोध सुरु आहे.

(३) भुसावळ शहरातील भुसावळ शहर तसेच भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन येथे गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण आणणेसाठी व नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी पोलीस गस्त वाढविण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे डायल ११२, दामिनी व बीट पेट्रालिंग व्दारे नागरिकांना तात्काळ आवश्यक पोलीस मदत पुरविण्यात येत आहे.

तसेच भुसावळ शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी भुसावळ शहर पोलीस स्टेशन व भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन येथे सन २०२४ पासून सन २०२६ (फेब्रुवारी अखेर) पर्यंत MPDA अंतर्गत ६, मपोका कलम ५५ अन्वये २, मपोका कलम ५६ अन्वये ४४ व मपोका कलम ५७ अन्वये २ अश्या प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## 'द एशियाटीक सोसायटी ऑफ बॉम्बे' संस्थेच्या सदस्यांची निवडणूक जाहीर करण्याबाबत

**(३) * ८०२९ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या सांस्कृतिक क्षेत्रातील बहुप्रतिक्षित "द एशियाटीक सोसायटी ऑफ बॉम्बे" या ऐतिहासिक संस्थेमध्ये कोरोना कालावधीपासून कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत अडचणी निर्माण झाल्या असून, संस्थेमधून मौल्यवान पुस्तके गहाळ झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, तसेच विश्वस्त मंडळामध्ये अमराठी व्यक्तींकडे संस्थेचे कामकाज दिले गेल्यामुळे संस्थेच्या कार्यपध्दतीबाबत आक्षेप घेण्यात येत असून, संस्थेकरिता आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेच्या अध्यक्ष निवडीनंतर सदस्यांची निवडणूक माहे डिसेंबर, २०२५ मध्ये नाताळपूर्वी घेणे अपेक्षित असताना, सदस्य याद्यांमधील गोंधळ व विसंगतीमुळे अद्याप सदर निवडणूक पार पडलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदस्य याद्यांमधील विसंगती दूर करून अधिकृत व अंतिम सदस्य यादी किती कालावधीत जाहीर करण्यात येणार आहे तसेच सदस्यांची निवडणूक कोणत्या कालमर्यादेत घेण्यात येणार आहे,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निवडणूकीकरिता सदस्य याद्यांतील त्रुटी दूर करून निवडणूक लवकर घेऊन संस्थेच्या आर्थिक अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

"द एशियाटीक सोसायटी ऑफ बॉम्बे" हा न्यास सार्वजनिक न्यास म्हणून दिनांक १५/१०/१९५४ रोजी नोंदविण्यात आलेला असून त्यास न्यास नोंदणी क्र. ई-१०२० (मुंबई) देण्यात आलेला आहे. सदर न्यासाच्या संदर्भात उपस्थित केलेल्या मुद्यांचे मुद्देनिहाय उत्तर/स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे-

१. वेतनासंदर्भातील प्रश्न –

प्राप्त माहितीनुसार न्यासाचे दैनंदीन व्यवस्थापन पाहणेसाठी कर्मचारी नियुक्त असून त्यामधे एकूण २३ कर्मचारी कायम आणि ४ कर्मचारी कंत्राटी आहेत. कोरोना कालावधीत शासनाच्या निर्देशानुसार ग्रंथालय बहुतांश कालावधीसाठी बंद होते.आर्थिक वर्ष २०२०-२१ या कालावधीचे थकीत वेतन एकत्रीत रुपये १८,५५,८९६/-कर्मचाऱ्यांचे खाती दिनांक ०८ नोव्हेंबर, २०२१ रोजीचे पत्रान्वये देण्यात आले. माहे जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२१ या कालावधीचे कर्मचाऱ्यांचे उर्वरित थकीत वेतन एकत्रीत रुपये २६,८५,२२३ /- दिनांक २८/१०/२०२४ रोजी कर्मचाऱ्यांचे खाती जमा करण्यात आल्याचे दिसून येते. आजरोजी कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा कोणताही प्रश्न प्रलंबित नसल्याचे न्यास प्रशासनामार्फत प्रतिनिधी / माजी पदाधिकारी यांनी जबाबात सांगीतले आहे.

२. गहाळ पुस्तकांच्या संदर्भातील प्रश्न -

प्राप्त माहितीनुसार न्यासाच्या तत्कालीन टेक्नीकल असिस्टंट, स्टॉक टेकींग इंचार्ज श्रीमती प्रियांका पी मेस्त्री यांनी न्यासाचे सचिव यांना दिनांक ०४/०९/२०२४ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार पुस्तक

तपासणी प्रक्रिया दोन टप्प्यात दिनांक १ जानेवारी, २०२४ ते दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ आणि दिनांक ०८ ऑगस्ट, २०२४ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०२४ दरम्यान करण्यात आली. त्यादरम्यान २०५० पुस्तकांचा आढळ (Untraced) होत नसल्याचे अहवालात नमूद केले आहे. सदर नमूद पुस्तकांची यादी न्यास प्रशासनाने धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या निरीक्षकांकडे प्रथमत: सादर केली नाही. परंतु, नंतर पुन्हा भेट देवून मागणी केल्यानंतर सादर केली.

३.विश्वस्तांमधे अमराठी लोकांकडे गेलेला संस्थेचा कारभारासंदर्भातील प्रश्न –

सदर न्यासाचे सन २०२२ ते २०२५ या कालावधीमध्ये दाखल बदल अर्जाचे अवलोकन केले असता त्यामध्ये मराठी व अमराठी अशा दोन्हीही भाषिक लोकांचा समावेश दिसून येतो.

४. सार्वजनिक निधी संदर्भातील प्रश्न –

उपलब्ध दस्तऐवज पाहता न्यासास केंद्र सरकारच्या सांस्कृतीक मंत्रालयाकडून दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजीचे पत्रान्वये ५ करोड रुपये भांडवली अनुदान (Corpus Grant) दिल्याचे व त्याच पत्रातील मुद्दा क्र. (ii) अन्वये न्यासास केंद्र सरकारकडून नियमीत मिळणारे वार्षिक अनुदान १ करोड रुपये निश्चित केल्याचे दिसून येते.

तसेच, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून सुध्दा दिनांक ०८ मार्च, २०२३ रोजीचे शासन निर्णयानुसार निधीच्या विनियोगाच्या तपशीलासह आणि काही अटींचे अनुपालन करण्याचे निर्देशासह प्रतिवर्ष १ करोड रूपये देण्यात आल्याचे दिसून येते.

तसेच, मुंबई महानगर पालिकेकडून सन २०२३-२०२४ मध्ये ५० लक्ष रूपये, सन २०२४-२०२५ मध्ये ७५ लक्ष रूपये व सन २०२५-२०२६ मध्ये ७५ लक्ष रूपये अनुदान प्राप्त झाल्याचे दिसून येते.

तसेच, न्यासाच्या धर्मादाय आयुक्त कार्यालयातील संकेतस्थळावर दाखल मागील तीन वर्षाच्या हिशोबपत्रकांचे अवलोकन करता न्यासास सन २०२२-२३ करीता १,६०,००,०००/- रुपये, सन २०२३-२४ करीता २,५०,००,०००/-रूपये व सन २०२४-२५ करीता २,७५,००,०००/- रुपये अनुदान प्राप्त झाल्याचे दिसून येते. तसेच सन २०२४-२५ च्या हिशोबपत्रकानुसार न्यासाची १७,७५,६५,४०१/- रुपयांची गुंतवणूक असल्याचे दिसून येते.

(२) हे अंशत: खरे आहे.

प्रस्तुत न्यासाच्या पदाधिकारी तथा विश्वस्त आणि सदस्य निवडणुक संदर्भात विश्वस्त निधीपत्र (ट्रस्ट डीड) व नियम व नियमावली मंजूर झालेली आहे.

सदर नियमावलीप्रमाणे न्यासास एक व्यवस्थापकीय मंडळ व विश्वस्तमंडळ असेल अशी तरतुद आहे.

• नियम ७ प्रमाणे महाराष्ट्र राज्याचे महामहीम राज्यपाल हे संस्थेचे पदसिध्द मुख्य संरक्षक असतील.

• नियम १४(अ) नुसार न्यासाच्या व्यवस्थापकीय / कार्यकारी मंडळामध्ये एक अध्यक्ष, चार उपाध्यक्ष, एक मानद सचिव आणि निवासी सदस्यांमधून निवडून आलेले पंधरा सदस्य असतील अशी तरतुद आहे.

• अध्यक्ष, उपाध्यक्ष व मानद सचिव यांचा कार्यकाळ दोन वर्ष असेल. तसेच पंधरा सदस्यांचा कार्यकाळ हा तीन वर्षाचा असेल अशी तरतुद आहे.

• पंधरा सदस्यांपैकी दर तीन वर्षानंतर एक तृतीयांश सदस्य किंवा पाच सदस्य निवृत्त होतील व त्यांच्या जागी नविन पाच सदस्यांची निवड केली जाईल.

• नियम १७ (अ) प्रमाणे न्यासाच्या वर्षिक सर्वसाधारण सभेत सहा वर्षांच्या कालावधीसाठी पदभार सांभाळण्यासाठी सहा पेक्षा जास्त विश्वस्तांना आमंत्रित केले जाणार नाही अशी तरतुद आहे.

• सदर सहा विश्वस्तांपैकी एक तृतीयांश विश्वस्त दर दोन वर्षांनी निवृत्त होतील.

• प्राप्त माहितीनुसार न्यासाच्या २२१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दिनांक ०९ सप्टेंबर, २०२५ रोजी काढण्यात आलेल्या सभा सुचने नुसार दिनांक २७ सप्टेंबर, २०२५ रोजी घेण्यात आलेल्या न्यासाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये विविध पदांकरीता खालीलप्रमाणे निवडणूक कार्यक्रम मंजूर करण्यासंदर्भात ठराव मंजूर करण्यात आला होता.त्यास अनुसरुन दिनांक ०३/१०/२०२५ रोजी नोटीस काढून सुधारीत मतदानाचा दिनांक निश्चित करण्यात आला होता.तत्कालीन वेळेस सदर निवडणुक कार्यक्रम पुढीलप्रमाणे निश्चित केल्याचे दिसून येते -

१)उमेदवारी अर्ज वितरीत करणे :-दिनांक १६/१०/२०२५ ते दिनांक २५/१०/२०२५.

२)उमेदवारी अर्ज दाखल करणे :-दिनांक २५/१०/२०२५ दुपारी ३ पर्यंत

३) उमेदवारी अर्जांची पडताळणी :-दिनांक २८/१०/२०२५ दुपारी ३:३० वा.

४)उमेदवारी अर्ज मागे घेणे :-दिनांक ३०/१०/२०२५ दुपारी ३ वा पर्यंत

५)मतदान प्रक्रीया :- दिनांक ०८/११/२०२५ दुपारी ३:३० ते ०६:३०.

धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे निरीक्षक यांच्या चौकशीतील जबाबानुसार सदर निवडणुक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर एकूण १७२१ नागरिकांनी न्यासाचे सदस्यत्व मिळणेकरीता अर्ज सादर केले. त्यापैकी १३६३ नागरीकांनी सभासद शुल्क भरलेले आहे. सदरचे अर्जदार हे ०१ एप्रिल, २०२५ ते १६ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत नव्याने अर्ज केलेले नागरीक आहेत. करीता नविन निवडणुकीसाठी नेमके कोणते सभासद ग्राह्य धरायचे याकरीता न्यासाचे काही सभासदांनी सहाय्यक धर्मादाय आयुक्त-०७ बृहन्मुंबई यांचेसमोर महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ४१अ अन्वये अर्ज क्र.७१/२०२५ हा प्रशासकीय निर्देश मिळणेकरीता सादर केलेला होता.

सदर अर्जावरील चौकशीनंतर दिनांक ३१/१०/२०२५ रोजी आवश्यक ते प्रशासकीय निर्देश देण्यात आलेले होते. सदर प्रशासकीय निर्देशानुसार असे निर्देशित करण्यात आले होते की, निवडणुक निर्णय अधिकारी यांनी दिनांक २७/०९/२०२५ रोजी घेण्यात आलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेनुसार दिनांक ०३/१०/२०२५ पर्यंतची सदस्य यादी ग्राह्य धरावी व नियमावलीनुसार निवडणुक घेण्यात यावी.

सदर आदेश हा संबंधितांनी मा.उच्च न्यायालयामध्ये आव्हानित केला. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी सदर प्रशासकीय निर्देश रद्द केले. करीता न्यासाच्या दिनांक २७ सप्टेंबर, २०२५ रोजी पार पडलेल्या २२१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील विषयानुसार निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यात आला होता,व त्यानुसार निवडणूक प्रक्रीया दिनांक ०८ नोव्हेंबर, २०२५ रोजी संपणार होती. मात्र दिनांक ०८/११/२०२५ रोजीची प्रत्यक्ष मतदान प्रक्रीया पूर्ण करण्यात आली नाही.

(३) धर्मादाय आयुक्त कार्यालयातील निरीक्षकांनी केलेल्या चौकशीमध्ये न्यासातर्फे असे सांगण्यात आले की, उपरोक्त प्रमाणे नमूद निवडणूक कार्यक्रमानुसार प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रीया पार पाडणेकरीता दिनांक व वेळ निश्चित करणेसाठी कार्यकारी मंडळाची सभा दिनांक २० फेब्रुवारी, २०२६ रोजी घेण्यात येवून त्यात प्रत्यक्ष मतदानाचा दिनांक हा १४ मार्च, २०२६ निश्चित करण्यात आला आहे. मात्र सदर सभेचे इतिवृत्त लेखन करण्यात आले नसल्याबाबत न्यास प्रशासनाने नमूद केले आहे. निरीक्षक तपासणी दरम्यान वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २७/०९/२०२५ आणि कार्यकारी मंडळाची सभा दिनांक २०/०२/२०२६ या

दोन्ही सभेच्या इतिवृत्ताची मागणी तपासकामी केली असता न्यास प्रशासनाद्वारे सदर इतिवृत्त अद्याप तयार नसल्याचे सांगण्यात आले. मात्र काही दिवसांनंतर दिनांक २०/०२/२०२६ चे स्वाक्षरी नसलेले इतिवृत्त पुरविण्यात आले.

धर्मादाय आयुक्त कार्यालयातील निरीक्षकाने चौकशी करून सादर केलेल्या अहवालावरून अनेक बेकायदेशीर बाबी व कामकाजातील अनियमितता निदर्शनास आल्यामुळे सदर अहवाल किरकोळ अर्ज क्र.३२/२०२६ प्रमाणे नोंदविण्यात आला व सदस्य याद्यांमधील गोंधळ व विसंगतीमुळे दिनांक १३/०३/२०२६ रोजीचे आदेशान्वये दिनांक १४/०३/२०२६ रोजी होणारी निवडणुक तात्काळ प्रभावाने स्थगित करण्यात आली. सदर आदेशान्वये धर्मादाय कार्यालयातील निरीक्षकाची फिट पर्सन म्हणून नेमणुक करण्यात आली. तसेच संस्थेच्या घटनेनुसार निवडुन आलेले कार्यकारी मंडळ अस्तित्वात येईपर्यंत फिट पर्सन व सन २०२४ ते २०२७ या कालावधीसाठी निवडलेल्या कार्यकारी मंडळातील सदस्यांची एक समिती संस्थेचा कारभार पाहण्यासाठी नेमण्यात आली.

दिनांक १३/०३/२०२६ रोजीच्या आदेशाप्रमाणे फिट पर्सन तसेच इतर तीन लोकांची एक उपसमिती नेमण्यात येवून सन २०२५ च्या निवडणुकीकरीता कायदेशीर आणि पात्र मतदारांची यादी दोन महिन्यांचे आत तयार करून संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळ व नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्याचे निर्देश दिलेले आहेत. मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत कोणाचे आक्षेप प्राप्त झाल्यास संस्थेच्या नियम व नियमावली व कायदेशीर तरतुदीप्रमाणे पुढील १५ दिवसांत ते आक्षेप निकाली काढावेत आणि अंतिम मतदार यादी प्रसिध्द करावी असेही निर्देश दिलेले आहेत. अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर एक महिन्याचे आत निवडणुक प्रक्रिया पार पाडावी असेही आदेश दिलेले आहेत.

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे धर्मादाय आयुक्तांचे दिनांक १३/०३/२०२६ रोजीचे आदेशाविरूध्द रिट याचिका (स्टॅम्प) क्र.९४६२/२०२६ दाखल करण्यात आली. सदर याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४/०३/२०२६ रोजीची निवडणुक तात्काळ स्थगित करण्याचे धर्मादाय आयुक्तांचे आदेशास स्थगिती देण्याची मागणी फेटाळलेली आहे.

(४) किरकोळ अर्ज क्र.३२/२०२६ मधील दिनांक १३/०३/२०२६ रोजीचे आदेशान्वये कायदेशीर व पात्र मतदारांची यादी दोन महिन्यांचे आत तयार करून प्रसिध्द करण्यात येणार आहे. त्यानंतर मतदार यादीबद्दल आक्षेप असल्यास त्यांना आक्षेप दाखल करण्यासाठी १५ दिवसांची मुदत असेल. सदर आक्षेप त्यापुढील १५ दिवसांत निकाली काढण्यात येतील. त्यानंतर अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येईल. अंतिम मतदार यादी प्रसिध्द केल्यानंतर एक महिन्याचे आत निवडणुक प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे.

न्यासामध्ये / संस्थेमध्ये आर्थिक समस्या असले बाबत सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई येथे सुस्पष्ट अशी तक्रार प्राप्त नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत थेट कर्ज योजना सुरु करण्याबाबत

**(४) * ८०६५ श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.संजय केणेकर, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाची भागभांडवल मर्यादा १५०० कोटी रुपये करण्यात येऊन सदर महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लाभार्थ्यांकरीता थेट योजनेंतर्गत १ ते १० लाख रूपयांपर्यंतची कर्ज योजना सन २०१४ पासून बंद करण्यात आली असून, सदर योजना पुर्ववत सुरु करणे तसेच इतरही प्रलंबित मागण्या मान्य करुन घेण्यासाठी ऑल इंडिया बंजारा टायगर्स तर्फे दिनांक ३ ऑक्टोबर,२०२३ रोजी वा त्यादरम्यान आमरण उपोषण व बेमुदत साखळी उपोषण सुरु असताना संबंधित मंत्री महोदय, सन्मा तत्कालीन मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री व इतर कॅबिनेट मंत्री महोदयांना बंजारा समाजाच्या शिष्टमंडळाने भेट व निवेदन दिले असून, त्यांनी सदर मागण्या त्वरित मंजूर करण्याचे आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ तसेच ओबीसी आर्थिक विकास महामंडळामार्फत केंद्र शासनाच्या एनबीसीएफडीसी (NBCFDC) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या थेट कर्ज योजनांचा लाभ देण्याचे सन २०१४ पासून बंद करण्यात आले असून तसेच सन २०२४ पासून १० लाख रुपयांपर्यंतची कर्ज योजना उपलब्ध नसल्याने बंजारा समाजासह विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लाभार्थी २ ते १० लाख रुपयांपर्यंतच्या कर्ज योजनेपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले होते ते पुन:श्च सुरु करण्याबाबतचा इशारा बंजारा समाजाच्या वतीने देण्यात आला असून शासनाने त्वरित चौकशी करुन त्यांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२) व (३) राष्ट्रीय बंजारा परिषदेतर्फे प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालय, संभाजीनगर समोर दिनांक ०३/१०/२०२३ रोजी सकाळी १०.४० वाजेपासून आमरण उपोषण सुरु करण्यात येणार असल्याबाबत शासनास निवेदन प्राप्त झाले. सदर निवेदनाच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १४/१२/२०२३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत निवेदनातील मुद्यांच्या अनुषंगाने प्राप्त निर्देशांनुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :- वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या मान्यतेने महामंडळाची भागभांडवल मर्यादा रुपये २०० कोटी वरुन रुपये १००० कोटी करण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाला. त्यानुसार मंत्रिमंडळ प्रस्ताव नियोजन विभागामार्फत वित्त विभागास सादर करण्यात आला असता, वित्त विभागाने काही त्रुटी उपस्थित केल्या. सदर त्रुटींची पुर्तता करुन प्रस्ताव वित्त विभागाकडे फेरसादर करण्यात आला आहे.

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ यांच्यामार्फत केंद्र शासनाच्या एनबीसीएफडीसी (NBCFDC) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या थेट कर्ज योजनेचा लाभ सन २०१९ पर्यंत देण्यात आला. शासन निर्णय क्र. वनाम-२०१९/प्र.क्र.४५/महामंडळे, दिनांक १३/०९/२०१९ अन्वये न राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. तथापि, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर दिनांक २८/०१/२०१९ च्या शासन निर्णयान्वये रुपये १० लाखापर्यंतची वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजना सुरु करण्यात आली. तद्नंतर दिनांक १४/०५/२०२५ अन्वये सदर योजनेची कर्ज मर्यादा रुपये १० लाखावरुन रुपये १५ लाख अशी

वाढविण्यात आली आहे. तसेच वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळांतर्गत १ लक्ष रुपयांची थेट कर्ज योजना सुरु आहे.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळात वित्त व लेखा सेवेतील अधिकारी कार्यरत आहेत. तसेच वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळात वित्त व लेखा सेवेतील अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत वित्त विभागास कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## कोल्हापूर प्रादेशिक परिवहन विभागाचे बनावट संकेतस्थळ तयार करून वाहनधारकांची फसवणूक केल्याबाबत

**(५) * ८१२५ श्री.सत्यजीत तांबे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात प्रादेशिक परिवहन विभागाच्या (RTO) अधिकृत संकेतस्थळांसारखी बनावट संकेतस्थळे, मोबाईल ॲप्स तयार करून तसेच ई-लिंक पाठवून वाहनधारकांची आर्थिक फसवणूक केली जात असून राज्यातील मुंबई, पुणे आणि नागपूर यांसारख्या प्रमुख शहरांमध्येही मागील काळात बनावट ‘ई-चलन’ देयकाच्या लिंक्स पाठवून नागरिकांच्या बँक खात्यातील गोपनीय माहिती मिळवून त्याद्वारे लाखो रुपयांचा आर्थिक अपहार झाल्याच्या अनेक घटना माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकृत ‘gov.in’ हे डोमेन नसलेल्या संशयास्पद लिंक्स आणि ‘APK’ फाईल्स डाऊनलोड करण्यास सांगून नागरिकांचे ओटीपी व बँकिंग माहिती मिळविली जात असून, अशा फसवणुकीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे व यामुळे शासकीय विभागांची विश्वासार्हता कमी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रादेशिक परिवहन विभागाच्या नावे अशा प्रकारे बनावट संकेतस्थळे व लिंक तयार करणाऱ्या सायबर गुन्हेगारांच्या कारणांची व टोळयांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने नागरिकांची सायबर फसवणूक रोखण्यासाठी, अधिकृत शासकीय पोर्टल्सबाबत जनजागृती करण्यासाठी आणि अशा बनावट लिंक्सवर कायमस्वरूपी बंदी घालण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) कोल्हापूर जिल्ह्यात कोल्हापूर प्रादेशिक परिवहन विभागाच्या (RTO) अधिकृत संकेतस्थळांसारखी हुबेहूब बनावट संकेतस्थळे, मोबाईल ॲप्स आणि ई लिंक पाठवून वाहनधारकांची आर्थिक फसवणूक केल्यासंदर्भात गुन्हा नोंद नाही.

सन २०२५ मध्ये मुंबई, पुणे आणि नागपूर शहरामध्ये ई-चलन देयकाच्या बनावट लिंक्सच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक केल्यासंदर्भात एकूण ४० गुन्हे दाखल असून १७ आरोपींना अटक करण्यात आले आहे.

(२) व (३) राज्यात सन २०२५ मध्ये अधिकृत डोमेन नसलेल्या संशायस्पद लिंक्स आणि APK फाईल्स डाऊनलोड करण्यास सांगून नागरीकांची होत असलेली आर्थिक फसवणूकीसंदर्भात एकूण १९३ गुन्हे नोंद असून ३६ आरोपींना अटक करण्यात आले आहे.

राज्य शासनाने सायबर फसवणूकीला बळी पडणाऱ्या नागरिकांना विशेषत: महिला, बालके व ज्येष्ठ नागरिकांना केंद्र स्थानी ठेवून अत्याधूनिक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि संसाधनांनी युक्त अशा उपाय योजनांचा समावेश असलेल्या महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प कार्यान्वित केला आहे.

राज्यभरातील सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापे, नवी मुंबई येथे सायबर सुरक्षा प्रकल्पाचे मुख्यालय तसेच नोडल सायबर पोलीस स्टेशन कार्यरत असून त्याद्वारे राज्यातील ५० जिल्हा सायबर लॅब्स/ पोलीस ठाणे तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी कार्यरत आहे.

महाराष्ट्र सायबर कार्यालयाकडून २६ तज्ञ सल्लागारांच्या मदतीने राज्यातील १००० पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना Forensic Tools चे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले आहे.

सर्व प्रकारचे सायबर गुन्हे रोखण्याकरीता www.cybercrime.gov.in ही वेबसाईट व सायबर हेल्पलाईन नंबर १९३० बाबत सर्व सामान्य जनतेत महाराष्ट्र सायबरच्या सोशल मिडीया Twitter, Instagram, Facebook, YouTube अकांउट्सद्वारे जनजागृती करण्यात येत आहे.

तसेच राज्यातील ३४ रेल्वे स्थानकांवरून महारेल एलईडी/ एलसीडी स्क्रीनद्वारे सायबर गुन्ह्याबाबत प्रभाविपणे जनजागृती करण्यात येते.

राज्यातील वाहन चालक व नागरिक यांना बनावट परिवहन वेबसाईट्स, मोबाईल ॲप्स, तसेच खोट्या ई-चलन लिंकपासून सतर्क करण्याच्या उद्देशाने परिवहन विभागाच्या वेबसाईटवर प्रसिद्धीपत्रक प्रसिध्द करण्यात आले आहे.

सर्व प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्यामार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील स्थानिक वृत्तपत्रांद्वारे बनावट परिवहन वेबसाईट्स, मोबाईल ॲप्स, तसेच खोट्या ई चलन लिंक याबाबत जनजागृती करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## राज्यातील ऑनलाईन भाडेकरार नोंदणी प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी दूर करण्याबाबत

**(६) * ८२०४ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **माहिती तंत्रज्ञान मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वच भागांत गेल्या सहा ते सात दिवसांपासून ‘आधार’ (यूआयडी) पडताळणी सेवा बंद असल्यामुळे ऑनलाईन भाडेकरार नोंदणी प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाली असून, मुद्रांक शुल्क विभागाच्या ऑनलाईन प्रणालीमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे तसेच महसूल विभाग व माहिती तंत्रज्ञान संचालनालय (डीआयटी) यांच्यातील तांत्रिक समन्वयाच्या जबाबदारीत त्रुटी निर्माण झाल्याने सर्वसामान्य नागरिकांची कामे प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई आणि पुणे ग्रामीण वगळता उर्वरित महाराष्ट्रात दररोज सुमारे चार ते पाच हजार भाडेकरारांचे दस्त नोंदविले जात असताना, ही सेवा खंडित झाल्यामुळे शासनाचा महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून नागरिकांना विनाकारण आर्थिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऑनलाईन पेमेंटसाठीची 'ग्रास' प्रणाली आणि आधार पडताळणीसाठीची 'यूआयडीएआय' प्रणाली यांच्यातील तांत्रिक साखळी खंडित झाल्यामुळे निर्माण झालेल्या या संपूर्ण प्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय, त्या अनुषंगाने तांत्रिक दोष दूर करून नोंदणी प्रक्रिया तातडीने पूर्ववत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार:** (१) व (२) होय, हे अंशतः खरे आहे.

ऑनलाईन भाडेकरार नोंदणी प्रक्रिया तांत्रिक अडचणीमुळे पूर्ण करण्यास नागरीकांना काही अडचणी उद्भवल्या. तथापि, सदर सेवा ह्या पूर्णपणे व दिर्घकाळ खंडीत राहलेल्या नसून अडचणी तात्पुरत्या व मर्यादीत स्वरुपाच्या होत्या. माहिती व तंत्रज्ञान संचालनालय तसेच महसूल विभाग यांनी समन्वयाने तांत्रिक अडचणी दूर करून सेवा पुर्वरत केल्या त्यामुळे शासनाचा महसूल बुडालेला नसून काही प्रमाणात विलंबाने प्राप्त झाला.
(३) सदर तांत्रिक दोषाचे प्रमुख कारण माहिती तंत्रज्ञान संचालनालय यांच्याकडे यूआयडीएआय संबंधित डिजिटल प्रमाणपत्र कालबाह्य झाल्यामुळे प्रणालीमधील तांत्रिक साखळीमध्ये तात्पुरता अडथळा निर्माण झाला होता. सदर बाब निर्दशनास येताच महसूल विभाग, माहिती तंत्रज्ञान संचालनालय व संबंधित तांत्रिक सेवा प्रदाते यांच्यामार्फ़त तात्काळ कार्यवाही करण्यात येवून डिजिटल प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्यात आले व प्रणालीमधील तांत्रिक समन्वय पुर्नसंचयित करण्यात आला व सेवा त्वरित पुर्वरत करण्यात आली. सद्यस्थितीत माहिती तंत्रज्ञान संचालनालय हे नोंदणी विभागासाठी Authentication User Agency (AUA) व KYC User Agency (KUA) म्हणुन कार्यरत आहे. तथापि, कार्यक्षमता वाढविणे,प्रक्रिया सुलभ करणे व सेवा वितरण अधिक पारदर्शक करण्याच्या दृष्टिने यापुढे नोंदणी व मुद्रांक विभाग UIDAI मार्फ़त Authentication User Agency (AUA) व KYC User Agency (KUA) म्हणुन कार्य करणार असल्याचे महसूल विभागाच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. यामुळे संबंधित सेवांमध्ये स्वायत्तता, गती व कार्यक्षमतेत वाढ होण्यास मदत होणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील १८ न्यायालयीन इमारतींची दुरवस्था झाल्याबाबत

**(७) * ८३५८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पुणे, रायगड, रत्नागिरीसह एकूण १८ न्यायालयीन इमारती जीर्ण व मोडकळीस आलेल्या अवस्थेत असून त्यांची दुरुस्ती अथवा संरचनात्मक सुधारणा करण्यासाठी संबंधित प्राधिकरणांकडून, विशेषतः पुरातत्व विभाग अथवा वारसा संवर्धनाशी संबंधित संस्थांची पूर्वपरवानगी आवश्यक असल्यामुळे दुरुस्तीची कामे प्रलंबित असल्याची बाब दिनांक ६ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर न्यायालयीन इमारतींपैकी बहुसंख्य इमारती या सन १८७८ ते १९८२ या कालावधीत उभारण्यात आलेल्या असून, त्यांपैकी अनेक इमारती ऐतिहासिक व स्थापत्यदृष्ट्या महत्त्वाच्या असतानाही त्यांना अद्याप अधिकृतरीत्या 'हेरिटेज' दर्जा प्रदान करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर इमारतींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाने संबंधित विभागांकडून माहिती मागवून दुरुस्ती, संरचनात्मक मजबुतीकरण, पुनर्बांधणी अथवा आवश्यक पर्यायी इमारती उभारण्याबाबत तसेच, ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन या इमारतींना 'हेरिटेज' दर्जा प्रदान करून त्यांचे संवर्धन व दुरुस्ती जलदगतीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४)
अ) सदर प्रकरण मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे न्यायप्रविष्ट असून सदर प्रकरणी उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून दिनांक ०५/१२/२०२५ रोजी प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे. सदर प्रतिज्ञापत्रानुसार सदर १८ इमारतींमध्ये दर्यापूर (जि.अमरावती), खुलताबाद (जि.छत्रपती संभाजीनगर), जुनी राधाबाई इमारत कोल्हापूर (जि.कोल्हापूर), बिलोली, हदगाव व देगलूर (जि.नांदेड), तळोदा (जि.नंदुरबार), नाशिक जुनी इमारत व नाशिक जुने रेकॉर्ड रुम (जि.नाशिक), परभणी व जिंतुर (जि.परभणी) हिंगोली व कळमनुरी (जि.हिंगोली), जुन्नर (जि.पुणे), अलिबाग (जि.रायगड), दापोली (जि.रत्नागिरी), लघुवाद न्यायालय, मुंबई व मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, गिरगाव व बॅलार्ड पियर यांचा समावेश आहे. सदर इमारती १८३७ ते १९८३ या कालावधीत उभारलेल्या आहेत.
ब) त्यापैकी कोल्हापूर, दापोली, जून्नर, लघुवाद न्यायालय मुंबई येथील ३ पैकी एका इमारतीस व मुख्य न्यायदंडाधिकारी कार्यालय, गिरगाव व बॅलार्ड पियर या इमारतींना हेरिटेज दर्जा प्रदान करण्यात आलेला आहे.
क) त्यापैकी दर्यापूर, तळोदा, खुलताबाद, हदगाव, देगलूर, परभणी, नाशिक जुने रेकॉर्ड रूम, अलिबाग येथील इमारती पाडून त्याच जागी नवीन इमारती बांधण्यात आल्या आहेत.
ड) त्यापैकी जिंतूर येथील जुनी इमारत पाडण्याची सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांनी शिफारस केली आहे.
इ) त्यापैकी दापोली, जुन्नर, हिंगोली येथील इमारती वापरात नसून सदर इमारतींमधील न्यायालये इतरत्र बांधलेल्या इमारतींमध्ये स्थलांतरीत करण्यात आलेली आहे. दापोली येथील इमारत दुरूस्त करण्याबाबत जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, दापोली यांना कळविले आहे. जुन्नर येथील इमारत दुरूस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांच्या ताब्यात देण्याकरीता मा.उच्च न्यायालयास विनंती करण्यात आली आहे.
ई) त्यापैकी अलिबाग, कोल्हापूर, बिलोली, कळमनुरी, नाशिक जुनी इमारत, लघुवाद न्यायालय, मुंबई व मुख्य न्यायदंडाधिकारी, गिरगाव येथील इमारती वापरात आहेत. बिलोली येथील इमारतीची दुरूस्ती करणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर यांना कळविण्यात आले आहे. लघुवाद न्यायालय, मुंबई येथील तिन्ही इमारतींच्या दुरूस्तीची कामे सुरू आहेत.

उ) सदर १८ इमारतीबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने वापरात असलेल्या तसेच विनावापर इमारतींना "हेरिटेज" दर्जा प्रदान करून त्यांची संवर्धन व दुरूस्ती करण्याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार शासनाकडून कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी आराखडा तयार करण्याबाबत

**(८)** * **८३६९ श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर हा पर्यटन जिल्हा म्हणून ओळखला जात असून, सन २०१० मध्ये या शहराला 'महाराष्ट्राची पर्यटन राजधानी' म्हणून घोषित करण्यात येऊनही पर्यटनाच्या अनेक योजनांची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यात विविध प्रसिध्द ऐतिहासिक व धार्मिक स्थळे असून, जिल्ह्यातील पर्यटन विकासास गती मिळण्याच्या दृष्टीने गत १५ वर्षांमध्ये पर्यटनस्थळी पायाभूत सुविधांची विकासकामे झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी ठोस आराखडा तयार करून त्यास प्रशासकीय स्तरावर जलदगतीने मान्यता देण्याबाबत तसेच निधीची तरतूद करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई :** (१), (२) व (३) पर्यटन विभाग, शासन निर्णय दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये छत्रपती संभाजीनगर जिल्हा "पर्यटन जिल्हा" म्हणून घोषित करण्यात आला आहे.

प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत सन २०२१-२२ ते २०२४-२५ या कालावधीसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील रुपये १२६.४० कोटी रकमेच्या कामांना प्रशासकीय मान्यता देवून रुपये ६९.४३ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

पर्यटन विभागामार्फत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या आराखड्यांबाबतचा तपशील:-

| क्र. | शासन निर्णय दिनांक | आराखडा | प्रशासकीय मान्यता (रुपये कोटी) | वितरीत निधी (रुपये कोटी) |
|---|---|---|---|---|
| १ | ३१ मार्च, २०१७ | म्हैसमाळ, वेरुळ, खुल्ताबाद, सुलीभंजन विकास आराखडा | ९८.०६ | ३१.६९ |
| २ | १० जुलै, २०२४ | संत ज्ञानेश्वर उद्यान, पैठण विकास आराखडा | १४९.०० | ०८.०० |

पर्यटन विभागामार्फत पैठण येथील Development of Paithan (रुपये ९०.०० कोटी) व Development of Tourist Infrastructure at Paithan (रुपये १९६.०० कोटी) असे दोन प्रस्ताव अनुक्रमे प्रसाद (PRASHAD) व स्वदेश दर्शन २.० या योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयास मान्यतेस्तव सादर करण्यात आले आहेत.

पर्यटन विभागाच्या सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाच्या वार्षिक पणन व ब्रँडिग कृती आराखड्या अंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पर्यटन स्थळांची देश-विदेशात प्रसिध्दी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्री अंबिका देवस्थान साबळेवाडी (ता.खेड, जि.पुणे) तीर्थक्षेत्रास ‘क’ वर्ग दर्जा देण्याबाबत

**(९) * ८३८२ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री अंबिका देवस्थान साबळेवाडी (ता.खेड, जि.पुणे) या तीर्थक्षेत्राला 'क' वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा मिळण्याबाबतचे निवेदन तीर्थक्षेत्र श्री अंबिका देवस्थान ट्रस्ट साबळेवाडी यांनी मा.पर्यटनमंत्री, मा.पर्यटन राज्यमंत्री, प्रधान सचिव, पर्यटन विभाग यांना दिनांक १७ मार्च, २०२५ रोजी वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री अंबिका देवस्थान तीर्थक्षेत्रास ‘क’ वर्ग दर्जा दिल्यास तळेगाव-शिक्रापूर महामार्गाच्या बाजूला असलेले श्री अंबिका मातेचे मंदिर परिसराचा विकास होऊन भाविकांना सुविधा उपलब्ध होण्यास मदत होईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री अंबिका देवस्थान साबळेवाडी, पुणे येथील परिसराचा विकास करून सोयी-सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.शंभूराज देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

श्री.अंबिका देवस्थान, साबळेवाडी, ता.खेड, जि.पुणे या तीर्थक्षेत्रास पुणे जिल्हा नियोजन समितीच्या दिनांक २०/०७/२०२४ रोजीच्या बैठकीत “क” वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्यात आला आहे.

(३) सदर तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सन २०२४-२५ व २०२५-२६ या आर्थिक वर्षात ग्रामपंचायत जन सुविधांकरीता अनुदान व ग्रामीण मार्ग विकास योजनेंतर्गत रुपये १०८.५९ लक्ष रक्कमेच्या एकूण ०८ विकास कामांना मंजूरी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली शहरातील नाट्यगृहाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१०) * ८३९५ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.दादाराव केचे, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उपमुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली हे जिल्ह्याचे ठिकाण असूनही सदर शहरात अद्याप सुसज्ज नाट्यगृह उभारण्यात आले नसल्याची बाब माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिंगोली जिल्ह्याला धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा लाभलेली असतानाही हक्काचे व्यासपीठ नाट्यगृह नसल्यामुळे स्थानिक कलाकारांना खाजगी मंगल कार्यालय आणि इतर जिल्ह्यातील नाट्यगृहांचा आधार घ्यावा लागत असून, हिंगोली येथील इंदिरा खुले नाट्यगृहाचे काम दहा वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याने येथील नाट्यकर्मी आणि रसिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नाट्यगृहाचे अपूर्णावस्थेतील काम तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव शिंदे :** (१) हिंगोली येथे नाट्यगृह मंजूर असून नाट्यगृहाची स्थापत्य विषयक कामे पूर्ण झालेली आहेत.
(२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने हिंगोली येथील इंदिरा खुले नाट्यगृहास रुपये २.९६ कोटी निधी सन २००६-०७ मध्ये मंजूर केला होता.तथापि, कंत्राटदाने सदर काम पूर्ण न केल्याने नगरपरिषदेने सर्वसाधारण सभा ठराव क्र.१६० अन्वये सदर कामाची निविदा रद्द केली आहे.
(३) व (४) वैशिष्टयपूर्ण योजनेंतर्गत दिनांक २७/०३/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये हिंगोली नगरपरिषदेस नाट्यगृहाचे बांधकाम करण्याकरीता रुपये ७.३७ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून सदर निधीतून हिंगोली नगरपरिषदेने औंढा रोड लगत स्व.खासदार संसदरत्न राजीव सातव नाट्यगृहाचे स्थापत्य विषयक कामे पूर्ण केली असून उर्वरीत अंतर्गत कामांबाबत नगरपरिषदेकडून संपूर्ण तपशिल व नेमकी निधी आवश्यकता याची माहिती घेण्यात येईल.

वैशिष्टयपूर्ण योजनेंतर्गत मंजूर अर्थसंकल्पीय निधी, नागरी भागातील पायाभूत विकासासाठी प्राप्त मागण्या व स्वीकृत दायित्व या अनुषंगाने निधी उपलब्धता तपासून निधी मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात येते.

-----------------

## अमरावती विभागातून कोट्यवधी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त केल्याबाबत

**(११)** * ८४७४ **श्री.संजय खोडके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई व नागपूरच्या महसूल गुप्तचर संचालनालय (DRI) आणि अंमली पदार्थ नियंत्रण विभागाने अत्यंत गोपनियरित्या राबविलेल्या सर्जिकल स्ट्राईक मोहिमेत आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत १० कोटी रुपये किंमत असलेले ५ किलो “मेफेड्रोन” (एमडी) दिनांक १ फेब्रुवारी, २०२६ रोजी अमरावती येथे जप्त केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाशिम जिल्ह्यातील कारंजा (लाड) परिसरात माहे डिसेंबर, २०२५ मध्ये सुमारे १९८ किलो मेफेड्रोन (एमडी) जप्त करण्यात आले असून, अमरावती विभागात वारंवार अंमली पदार्थ जप्तीच्या घटना घडत असल्याने हा परिसर आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ तस्करीच्या साखळीचा महत्त्वाचा केंद्रबिंदू बनत असल्याची बाबही निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गुप्तचर जाळे अधिक सक्षम करणे व संयुक्त विशेष पथके कार्यरत करुन सीमावर्ती व संवेदनशील भागांत नियमित नाकाबंदी व तपासणी करुन त्या ठिकाणी होत असलेल्या अंमली पदार्थाच्या खरेदी विक्रीबाबत शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित गुन्हेगारांवर कोणती कारवाई केली आहे, तसेच अमरावती भागातील अंमली पदार्थ विक्रीवर कायमस्वरुपी बंदी आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) महसूल गुप्तचर संचालनालय (DRI), अहमदाबाद झोनल युनिट, अहमदाबाद यांनी प्राप्त गुप्तचर माहितीच्या आधारे अमरावतीमध्ये ४ किलो ९०० ग्रॅम वजनाचा मेफेड्रोन (एमडी) ड्रग्ज जप्त केला आहे. सदर कारवाईत महसूल गुप्तचर संचालनालय (DRI), अहमदाबाद झोनल युनिट, अहमदाबाद यांच्यामार्फत चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(२) वाशिम जिल्ह्यातील कारंजा (लाड) परिसरात माहे डिसेंबर, २०२५ मध्ये सुमारे १९८ किलो मेफेड्रोन (एमडी) जप्त केल्या बाबत घटनेची नोंद नाही.

तथापि, दिनांक ०९/१२/२०२५ रोजी महसूल गुप्तचर संचालनालय (डीआरआय),मुंबई झोनल युनिट, मुंबई यांनी वर्धा जिल्ह्यातील कारंजा घाडगे येथे "ऑपरेशन हिंटरलँड ब्रू" या सांकेतिक नावाच्या कारवाईत एक गुप्त मेफेड्रोन उत्पादन युनिट उद्ध्वस्त केले आहे. सदर कारवाईत अंदाजे १९२ कोटी रुपये किंमतीचे १२८ किलो मेफेड्रोन, २४५ किलो प्रिकर्सर रसायने, कच्चा माल आणि संपूर्ण प्रक्रिया सेटअप जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात मुख्य सुत्रधारासह तीन व्यक्तींना एन.डी.पी.एस. कायदा १९८५ अन्वये अटक करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत सदर तिन्ही आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

(३) अमरावती शहर कार्यक्षेत्रात पोलीस विभागामार्फत सन २०२१ ते फेब्रुवारी २०२६ पर्यंत एम.डी. ड्रग्ज संदर्भात एकूण २९ गुन्हे दाखल असून १०१ आरोपींना अटक केली आहे. त्यामध्ये रुपये ७४,२१,१८५/- एवढ्या किंमतीचा अंमली पदार्थ जप्त केला आहे. त्यानुषंगाने एकूण ८३ आरोपींविरुध्द प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

दिनांक ०९/०३/२०२६ रोजी पोलीस स्टेशन नागपुरी गेट, अमरावती यांनी अमरावती शहर हद्दीत एम.डी. बाबत केलेल्या कार्यवाहीमध्ये २ आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून एकूण २ किलो ७९ ग्रॅम वजनाचा, रुपये ३,११,८५,०००/- इतक्या किंमतीचा एम.डी. हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपींविरुध्द पोलीस स्टेशन नागपुरी गेट, अमरावती येथे गु.र.क्र.०११२/२०२६, एन.डी.पी.एस. कायदा, १९८५ चे कलम ८(क), २१(क), २२(क),२८,२९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या पुढील तपासात आणखी २ असे एकूण ४ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

अमरावती शहर कार्यक्षेत्रात पोलीस विभागामार्फत सन २०२५ व फेब्रुवारी २०२६ मध्ये एम.डी. या अंमली पदार्थाबाबत दाखल २० गुन्ह्यांपैकी ७ गुन्ह्यांतील मुख्य सुत्राधारांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यातील आरोपींचा आंतरराष्ट्रीय तस्करीमध्ये सहभाग असल्याचे अद्यापपर्यंत निष्पन्न झालेले नाही.

अमरावती विभागाकरीता अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, (ANTF) ची स्थापना करण्यात आली आहे. तसेच पोलीस आयुक्तालय अमरावती शहर स्तरावर अंमली पदार्थ विरोधी सेल (ANC) ची स्थापना करण्यात आली आहे. पोलीस आयुक्तालय हद्दीत वेळोवेळी विशेष मोहिम राबवून अंमली पदार्थ

विरोधी जास्तीत जास्त कारवाया करण्यात येत आहे. तसेच संवेदनशील भागात नियमित नाकाबंदी व तपासणी करुन त्या ठिकाणी होत असलेल्या अंमली पदार्थ खरेदी-विक्री बाबत सखोल चौकशी करुन संबंधित गुन्हेगारावर कायदेशीर कारवाई करण्यात येते.

पोलीस आयुक्तालय अमरावती शहर अंतर्गत पोलीस विभागामार्फत पोलीस स्टेशन अंतर्गत शाळा/महाविद्यालयांना भेटी देवून अंमली पदार्थाच्या होणाऱ्या दुष्परिणामांबाबत जनजागृती उपक्रम राबविले जातात. तसेच पोलीस विभागामार्फत मॅरेथॉन स्पर्धा, ऑपरेशन ऑलआऊट, रेझींग-डे अंतर्गत आयोजित कार्यक्रमावेळी व शहरामध्ये बॅनर/सोशल मिडीयाद्वारे अंमली पदार्थांच्या होणाऱ्या दुष्परिणामांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन जनजागृती करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आष्टी (ता.तुमसर, जि.भंडारा) येथे वीजवाहिन्यांच्या तारांच्या शॉर्ट सर्किटमुळे शेतकऱ्यांचा ऊस जळून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याबाबत

**(१२)** * **८४७९ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील परिसरात महावितरण कंपनीच्या विद्युत वाहिन्या व तारा दीर्घकाळापासून धोकादायक स्थितीत असल्याबाबत स्थानिक नागरिक व शेतकऱ्यांकडून वारंवार तक्रारी करण्यात येत असूनही त्याकडे दुर्लक्ष केल्याने दिनांक १८ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान वीजवाहिन्यांच्या तारांमध्ये झालेल्या शॉर्ट सर्किटमुळे भीषण आग लागून एका शेतकऱ्याच्या सुमारे १ हेक्टर क्षेत्रावरील ऊस पीक पूर्णपणे जळून लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेनंतर स्थानिक नागरिक व शेतकरी संघटनांनी तसेच समर्थन संस्थेने संबंधित शेतकऱ्याला अद्याप नुकसान भरपाई न मिळाल्यामुळे मा.मुख्यमंत्री (ऊर्जा विभाग), मा.राज्यमंत्री (ऊर्जा विभाग) तसेच अपर मुख्य सचिव (ऊर्जा विभाग) यांच्याकडे दिनांक २२ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मदत देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनेबाबत शासनाने प्रत्यक्ष पंचनामा करून नुकसानीचे मूल्यांकन केले आहे काय, तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून संबंधित शेतकऱ्याला तातडीची नुकसानभरपाई, पीक विमा अथवा इतर शासकीय योजनांद्वारे आर्थिक मदत देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे,

मौजा आष्टी, ता.तुमसर, जि.भंडारा येथे श्री.दिगंबर जयराम गौपाले यांच्या शेतात दिनांक १८/१२/२०२५ रोजी लघुदाब वीज वाहिनीच्या दोन तारा एकमेकांच्या संपर्कात आल्याने शॉर्ट सर्किटमुळे आगीच्या ठिणग्या खाली पडल्याने आग लागून ऊसाच्या पिकाला आग लागून नुकसान झाले होते.

(२) हे खरे आहे.

(३) सदर अपघात प्रकरणी विद्युत निरीक्षक, भंडारा यांचेमार्फत दिनांक २४/१२/२०२५ रोजी चौकशी करण्यात आली असून, त्यांनी नुकसानग्रस्त शेतमालकास नुकसान भरपाई देण्याबाबत दिनांक १२/०२/२०२६ रोजीच्या पत्रांन्वये महावितरण कंपनीस कळविले आहे. त्यानुसार,उप कार्यकारी अभियंता,तुमसर यांनी दिनांक १६/०२/२०२६ रोजीच्या पत्रांन्वये संबंधित शेतमालकास नुकसान भरपाईकरीता लागणाऱ्या आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करण्याबाबत कळविले आहे. संबंधित कागदपत्रे प्राप्त होताच, महावितरण कंपनीमार्फत नुकसान भरपाई देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे.

तसेच, सदर प्रकरणी महावितरण कंपनीचे अधिकारी/कर्मचारी दोषी आढळल्यास संबंधितावर कंपनीच्या नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर गॅस वाहतूक करणाऱ्या टँकरच्या अपघातामुळे वाहतूक कोंडी झाल्याबाबत

**(१३) * ८५२४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर दिनांक ३ फेब्रुवारी, २०२५ रोजी आडोशी–बांगड्या परिसरात प्रोपलेन गॅस वाहतूक करणारा टँकर उलटून झालेल्या अपघातामुळे सदर मार्गावर सुमारे २८ तास वाहतूक पूर्णतः ठप्प झाल्यामुळे अतिज्वालाग्राही, ज्वलनशील व धोकादायक वायू व रसायनांच्या वाहतुकीसाठी अस्तित्वात असलेल्या नियम, अटी व सुरक्षात्मक उपाययोजनांबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेनंतर महामार्गावर २८ तास वाहतूक कोंडी झाल्यामुळे वाहनांमध्ये अडकलेल्या प्रवाशांना, बालकांना तसेच वृध्द लोकांना पाणी, जेवण तसेच मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याने अतोनात त्रास सहन करावा लागल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या घटनेची सखोल व तांत्रिकदृष्ट्या चौकशी करून, चौकशीदरम्यान कोणत्या त्रुटी आढळून आल्या असून, घातक वायू व रसायनांची वाहतूक करणाऱ्या वाहनांसाठी अधिक कडक नियमावली तयार करण्याबाबत तसेच दोषी व्यक्तींवर किंवा संबंधित वाहतूक कंपनीवर कायदेशीर कारवाई करुन वाहतूक कोंडीत अडकलेल्या वाहनांची केलेली टोलवसूली परत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर दिनांक ०३/०२/२०२६ रोजी, सायंकाळी ०५.०० वाजताचे सुमारास मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावर आडोशी बोगद्याजवळ प्रोपिलीन गॅस वाहतूक करणारा टँकर क्रमांक NL-०१-AG-४२५० याचा अपघात होऊन त्यामधील ज्वलनशील प्रोपिलीन वायूची गळती सुरु झाली होती. त्यामुळे, प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने द्रुतगती महामार्गावरील वाहतूक काही काळासाठी बंद करण्यात आली होती.

सदर अपघाताच्या अनुषंगाने मुंबईकडे जाणारी वाहतूक पुणे मार्गावर एका मार्गिकेमधून वळविण्यात आली होती व पुणे वाहिनीच्या उर्वरित दोन मार्गिका पुण्याकडे जाणाऱ्या वाहतुकीसाठी खुल्या ठेवण्यात आल्या होत्या. ही व्यवस्था दिनांक ०४/०२/२०२६ रोजी, रात्री ००.४४ वाजता दोन्ही वाहिनींच्या मध्य भागातील बॅरिअर हलवून करण्यात आली. तसेच मुंबईकडे जाणारी वाहतूक लोणावळा व खोपोली मार्गे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वर वळविण्यात आली होती.

(२) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर दिनांक ०३/०२/२०२६ रोजी झालेल्या अपघाताच्या अनुषंगाने उद्भवलेल्या वाहतूक कोंडीमध्ये अडकलेल्या प्रवाशांना मे. आय.आर.बी., मुंबई-पुणे एक्सप्रेसवे प्रा.लि. तसेच स्थानिक पोलीस यांच्यामार्फत पाणी, बिस्कीटचे पॅकेटस् इत्यादी खाद्यपदार्थांचे वाटप करण्यात आले होते.

(३) सदर अपघाताच्या अनुषंगाने वाहन चालकावर खोपोली पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र. ३२/२०२६, भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८१, १२५, १२५ (ए) सह मोटार वाहन अधिनियम कलम १८४ अन्वये दिनांक ०३/०२/२०२६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडीची दखल घेऊन त्याबाबत अभ्यास करणे तसेच भविष्यात अशी परिस्थिती उद्भवल्यास तातडीच्या उपाययोजना तसेच अशा परिस्थितीतील वाहतुकीचे नियोजन व प्रवाशांसाठी आपत्कालीन निर्गमन बाबतची कार्यप्रणाली तयार करण्यासाठी भारतीय रस्ते महासभा (IRC) चे माजी अध्यक्ष श्री.सी. पी. जोशी यांचे अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती नेमण्यात आली आहे.

सदर अपघातादरम्यानच्या कालावधीत वसुली करण्यात आलेल्या पथकराची रक्कम परत करण्याची कार्यवाही महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावरवाड (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील साई रेसिडेन्सी या संकुलातील नागरिकांची सुरक्षितता धोक्यात आल्याबाबत

**(१४)** * **८५७९ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावरवाड (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील साई रेसिडेन्सी या संकुलातील एका घरामधील जागेमध्ये रुद्रनाथ ट्रस्ट यांच्या माध्यमातून मोठ्या स्वरूपाचे प्रार्थना स्थळ उभारण्यात आले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रार्थना स्थळ उभारणी करताना परवानगी घेणे आवश्यक असताना सदरहू प्रार्थना स्थळ शासनाच्या सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करून व सर्व परवानगी घेऊन उभारण्यात आले आहे काय तसेच रुद्रनाथ ट्रस्ट ही संस्था महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था कायद्यांतर्गत नोंदणीकृत संस्था आहे काय,

(३) असल्यास, सदर घरामध्ये वास्तव्यास असलेले रहिवासी संकुलात वास्तव्यास नसलेल्या लोकांना विशेषतः तरुण-तरुणी यांना एकत्रित करून रात्री अपरात्री मोठ्या स्वरात चित्र विचित्र आवाज काढणे, घंटा नाद करणे, ढोल वाजविणे अशा प्रकारची कृत्ये वारंवार करीत असल्याचे निदर्शनास आल्याने स्थानिक रहिवाशांनी याप्रकरणी पोलीस ठाणे, मालवण येथे माहे १३ जानेवारी, २०२६ व जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात दिनांक १८ जानेवारी,२०२६ रोजी वा त्यादरम्यान तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, साई रेसिडेन्सी संकुलातील सदरहू जागेमध्ये रात्री तसेच दिवसभर वावर असणाऱ्या अनोळखी व्यक्तींमुळे संकुलातील इतर रहिवाशांची सुरक्षितता धोक्यात येऊन अनेक गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने, याप्रकरणी करण्यात आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित घर मालक व या घरामध्ये सतत वावर करणाऱ्या अनोळखी व्यक्ती यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सावरवाड (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील साई रेसिडेन्सी या संकुलात रुद्रनाद फाउंडेशन ट्रस्ट मुंबई यांचेमार्फत खाजगी जागेमध्ये दिनांक ०२/०१/२०२६ ते दिनांक १२/०१/२०२६ या कालावधीमध्ये स्फटिक शिवलिंगाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) साई रेसिडेन्सी सावरवाड (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथे स्फटिक शिवलींगाच्या प्राणप्रतिष्ठा करीता मा.धर्मादाय आयुक्त तसेच स्थानिक प्रशासन यांच्या आवश्यक त्या परवानग्या घेण्यात आल्या नसल्याचे दिसून आले आहे.

रुद्रनाथ ट्रस्ट ही संस्था सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई येथे महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमचे कलम १९ अन्वये, दिनांक २४ जून, २०२२ रोजी नोंदणीकृत करण्यात आलेली आहे.

(३) साई रेसीडेन्सी बंगला नं. ०९ मधील त्रासाबाबत "अशा आशयाचा तक्रारी अर्ज मालवण पोलीस ठाणे येथे दिनांक १३/०१/२०२६ रोजी प्राप्त झाला आहे.

तसेच, देव वेताळ ट्रस्टचे पदाधिकारी व वराड गावातील ग्रामस्थ यांनी दिनांक ०३/०२/२०२६, २६/०२/२०२६ व २७/०२/२०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग यांच्याकडे व तहसिलदार मालवण यांचे कार्यालयाकडे अर्ज / निवेदन सादर केलेले आहेत.

(४) व (५) सदर प्रकरणी मालवण पोलीस ठाणे येथे प्राप्त तक्रार अर्जाचे अनुषंगाने चौकशी केली असता अशा घटना घडल्याचे निदर्शनास आलेले नाही.

-----------------

## सांगली जिल्हा परिषदेच्या दोन कर्मचाऱ्यांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केल्याबाबत

**(१५) * ८५९१ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा परिषद यांच्या वित्त विभागातील दोन कर्मचारी यांना शासकीय कामाशी संबंधित प्रकरणात लाच स्वीकारत असताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ACB) यांच्या पथकाने माहे जानेवारी, २०२६ मध्ये अटक केली असून, विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भ्रष्टाचार प्रकरणातील गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित अटक करण्यात आलेल्या दोन्ही कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेतून निलंबित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारच्या भ्रष्टाचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी आणि नियंत्रण यंत्रणा बळकट करण्यासाठी वित्त विभागांतर्गत तपासणी व कामकाज पध्दतीत सुधारणा करून सदर प्रकरणात जबाबदार असणाऱ्या अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांवर किंवा देखरेख यंत्रणेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत दिनांक २७/११/२०२५ रोजी सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र.१, हे लाच रक्कम रुपये २०००/- घेताना रंगेहात पकडले. आलोसे क्र.२ यांनी लाच घेण्यासाठी प्रोत्साहित केल्याने दोन्ही आलोसे यांच्याविरुध्द विश्रामबाग पोलीस ठाणे, सांगली येथे गु.र.नं ३८७/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७, ७अ, १२ प्रमाणे दिनांक २८/११/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(२) हे खरे आहे.

सदर घटनेशी संबंधित दोन कर्मचाऱ्यांना दिनांक ०९/१२/२०२५ रोजीच्या आदेशान्वये सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.
(३) जिल्हा परिषद, सांगली येथील वित्त विभागातील कामकाज पध्दतीत सुधारणा करण्यासाठी:-
I. कार्यालयीन कामकाजामध्ये १०० टक्के ई-ऑफिस प्रणालीचा वापर अनिवार्य करण्यात आलेला आहे.
II. तसेच सदर प्रणालीमधील प्रलंबित प्रकरणांचा आढावा दर सप्ताह व महिन्याअखेर घेण्यात येतो
III. भ्रष्टाचार निर्मुलन समिती गठीत करण्यात आली असून समितीच्या बैठका नियमित घेण्यात येतात.
IV. तसेच वेळोवेळी दप्तर तपासणी, विभागनिहाय प्रलंबित प्रकरणे निकाली काढणेसाठी आढावा घेणे, जिल्हा परिषद प्रशासनामार्फत अधिकारी/कर्मचारी यांना पारदर्शकता, भ्रष्टाचारमुक्त कामकाज करण्याबाबत सक्त सूचना देणे व समुपदेशन करण्यात येते. तक्रार निवारणासाठी सूचना पेटी ठेवणे इत्यादी प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली आहे.
V. संबंधित दोन्ही कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करण्यात आलेली आहे.
VI. या प्रकरणाशी संबंधित असलेले साखळीतील वरिष्ठ अधिकारी यांची ACB मार्फत जबाब नोंदणी करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बंगलोर येथील विहान डायरेक्ट सेलिंग (क्युनेट) या कंपनीकडून कर्ज घेतलेल्या महिलांची लाखो रुपयांची फसवणूक झाल्याबाबत

**(१६)** * **८४६९ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विहान डायरेक्ट सेलिंग, बंगलोर (क्युनेट) या कंपनीकडून सन २०२३ मध्ये बाणेर (पुणे) येथे वास्तव्यास असणाऱ्या एका महिलेच्या सांगण्यावरुन कर्ज देण्याचे आमिष दाखवून अन्य महिलांची लाखो रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याची बाब माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिलांना आर्थिक फसवणूक झाल्याचे एक वर्षानंतर समजले असून सदर कंपनीकडे पैशाची मागणी केली असता त्यांना कंपनीने व्हॉट्सअप ग्रुपमधून काढून टाकल्याने तसेच पैशाचा कोणताच फ्री परतावा कंपनीकडून न आल्यामुळे, कर्जाचे भत्ते न भरल्यामुळे व मानसिक त्रास सहन न झाल्याने काहीं महिलांनी आत्महत्या केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी रावेत पोलीस स्टेशन, पुणे येथे गुन्हा दाखल केला असता तेथील पोलिसांनी कंपनीशी आर्थिक व्यवहार करुन संगनमत केले असून याबाबत तसेच हजारो महिलांची फसवणूक करणाऱ्या कंपनीची चौकशी करून त्यांचेविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान विहान डायरेक्ट सेलिंग, बंगलोर (क्युनेट) या कंपनीकडून सन २०२३ मध्ये बाणेर, पुणे येथे राहणाऱ्या एका महिलेच्या सांगण्यावरुन कर्ज देण्याचे आमिष दाखवुन अन्य महिलांची लाखो रुपयांची आर्थिक फसवणुक झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

तथापि, सन २०२४ मध्ये क्युनेट कंपनीमध्ये ५,४०,००० रुपये गुंतवणूक केल्यानंतर आर्थिक परतावा न मिळाल्याने आणि सदर आर्थिक फसवणुकीमुळे पैसे बुडाल्याने नवऱ्याकडून होणाऱ्या शारिरिक व मानसिक त्रासामुळे विवाहितेस आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याबाबतचा गुन्हा दिनांक ०७/११/२०२४ रोजी गु.र.नं. ४७६/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम. ८५, १०८, ११५ (२), ३५१ (२)(३), ३(५) प्रमाणे रावेत पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर प्रकरणी एकूण ५ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून दिनांक ३१/०३/२०२५ रोजी मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. प्रकरण सध्या न्याय प्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदुरा, मलकापूर आणि मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यांमध्ये पशुधन चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(१७)** * **८०१७ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा, मलकापूर आणि मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यांमध्ये गेल्या काही काळापासून मोठ्या प्रमाणावर पशुधन चोरीच्या घटना घडत असल्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ जानेवारी, २०२६ आणि १९ जानेवारी, २०२६ रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती विभाग, पोलीस अधीक्षक, बुलढाणा आणि जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन या तालुक्यांतील गेल्या तीन वर्षांतील पशुधन चोरीच्या नोंदविलेल्या गुन्ह्यांची संख्या, त्यापैकी निदर्शनास आलेल्या गुन्ह्यांची संख्या, अटक करण्यात आलेल्या आरोपींची संख्या व जप्त करण्यात आलेल्या पशुधनाची माहिती पोलीस ठाणेनिहाय संकलित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंतरजिल्हा गुन्हेगारी टोळीचा शोध घेऊन पशुधन चोरी प्रकरणातील संबंधित व्यापाऱ्यांवर व दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) लोकप्रतिनीधी यांनी दिनांक ०८/०१/२०२६ रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती व पोलीस अधीक्षक कार्यालय, बुलढाणा यांना निवेदन दिले आहे.

(२) सन २०२३ ते फेब्रुवारी २०२६ अखेरपर्यंत बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा, मलकापूर व नांदुरा तालुक्यातील पोलीस स्टेशन हद्दीत पशुधन चोरी संदर्भात खालीलप्रमाणे गुन्हे दाखल झालेले आहेत.

मोताळा तालुका :-बोराखेडी व धामणगाव बढे, पोलीस स्टेशन हद्दीत एकूण २४ गुन्हे दाखल झाले असून त्यामध्ये ८ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्ह्यांमध्ये एकूण ५०,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

मलकापूर तालुका :-

मलकापूर शहर, मलकापूर ग्रामीण व एम.आय.डी.सी. मलकापूर पोलीस स्टेशन हद्दीत एकूण १७ गुन्हे दाखल झाले असून त्यामध्ये ८ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच १० आरोपींना सूचनापत्र देण्यात आले असून सदर गुन्ह्यांमध्ये एकूण ६,९८,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

नांदुरा पोलीस स्टेशन हद्दीत एकूण १३ गुन्हे दाखल झाले असून त्यामध्ये ३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच ८ आरोपींना सूचनापत्र देण्यात आले असून सदर गुन्ह्यांमध्ये एकूण १,५५,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

(३) नांदुरा पोलीस स्टेशन, मलकापुर येथे आंतरजिल्हा पशुधन चोरी प्रकरणी ३ गुन्हे दाखल आहेत. सदर प्रकरणी एकूण ५ आरोपी अटकेत असून १ आरोपीस सूचनापत्रावर सोडले आहे. तसेच, २ आरोपींविरुध्द प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन योजनेतंर्गत ठाणे जिल्ह्यातील ज्येष्ठ कलाकारांना मानधन वितरीत करण्याबाबत

**(१८)** * **८०४२ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यात राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन योजनेंतर्गत पात्र ज्येष्ठ साहित्यिक व कलावंतांना मानधन देण्यासाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करणे आवश्यक असताना सदर समिती अद्याप स्थापन न झाल्यामुळे अनेक पात्र वृध्द कलाकारांचे मानधन प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हास्तरीय समिती स्थापन न झाल्यामुळे मानधन मंजुरी व वितरणाची प्रक्रिया प्रलंबित असल्याने अनेक वृध्द व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कलाकारांना उपजीविकेच्या गंभीर अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे जिल्ह्यात सध्या या योजनेंतर्गत किती अर्ज प्रलंबित आहेत व किती पात्र लाभार्थींचे मानधन मंजुरी अथवा वितरण प्रलंबित आहे, तसेच जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत संबंधित अधिकारी किंवा विभागास तातडीने समिती स्थापन करून प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

सन २०२४ व सन २०२५ मधील कलाकार निवड व मानधन मंजूरी प्रक्रिया करण्यासाठी ठाणे जिल्ह्यात जिल्हास्तरीय समिती स्थापन झालेली नाही.

सांस्कृतिक कार्य विभागाकडून "राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत यांना मानधन सन्मान योजना" सन १९५४-५५ पासून संपूर्ण राज्यात राबविली जाते. विभागाच्या दिनांक १६ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार जिल्हा स्तरावरील निवड समितीमध्ये मा.पालकमंत्री महोदय यांचेकडून जिल्ह्यातील ९ मान्यवर कलाकार व १ साहित्यिक सदस्य यांचे नामनिर्देशित करण्यात येते.

सद्य:स्थितीत सदर कालावधीतील एकूण १९२ प्रस्ताव जिल्हास्तरावर प्राप्त झालेले आहेत.

महाराष्ट्र राज्यातील "राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत यांना मानधन सन्मान योजना" अंतर्गत वृध्द कलावंताच्या अडचणी तसेच जिल्हास्तरीय निवड समितीबाबत तत्कालिन प्रधान सचिव यांनी दिनांक ०१ मार्च, २०२४ व तत्कालीन अपर मुख्य सचिव, सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७ नोव्हेंबर, २०२४ रोजी सर्व जिल्हाधिकारी व सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा यांची ऑनलाईन बैठक आयोजित केली होती.

तसेच मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य यांनी देखील दिनांक ०१ जुलै, २०२५ रोजी वृध्द कलावंताच्या मानधनाच्या अडचणीबाबत बैठकीचे आयोजन केले होते. त्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या दिनांक १८/०९/२०२५ रोजीच्या अर्ध शासकीय पत्राद्वारे सर्व जिल्हाधिकारी यांना वृध्द कलावंताच्या मानधनाच्या अडचणी दूर करण्याबाबत व त्यांच्या स्तरावरील समित्या गठीत करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या स्तरावरुन देखील जिल्हास्तरीय निवड समिती नियुक्तीबाबत दिनांक १२ मार्च २०२५, दिनांक ०२ जून २०२५, दिनांक १३ जून २०२५, दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ आणि दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजीच्या पत्रान्वये समित्या गठीत करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## श्रीगोंदा (जि.अहिल्यानगर) येथील ऐतिहासिक शिंदेवाडा, दिल्ली वेस आणि इतर पुरातन वास्तूंचे जतन व संवर्धन करण्याबाबत

**(१९)** * **८१२९ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथील महादजी शिंदे घराण्याच्या पराक्रमाची साक्ष देणारा ऐतिहासिक राजवाडा, दिल्ली वेस आणि इतर स्मृतीस्थळांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाल्याची तसेच ऐतिहासिक महत्त्व असलेल्या शिंदेवाड्याचे बुरूज कोसळले असून, पुरातत्व विभागाच्या दुर्लक्षामुळे या पुरातन वास्तू नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत व यामुळे ऐतिहासिक वारशाचे नुकसान होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वास्तूंच्या संवर्धनासाठी शासनाकडून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नसून प्रशासकीय अनास्थेमुळे या ऐतिहासिक वास्तूंचे अस्तित्व धोक्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वास्तुंच्या दुरवस्थेप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने ऐतिहासिक वास्तूंच्या दुरुस्तीसाठी व संवर्धनासाठी कृती आराखडा तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे अंशतः खरे आहे,

महादजी शिंदे वाडा व पुरातन दिल्ली वेस, ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर ही संचालनालयाच्या अंतर्गत राज्य संरक्षित स्मारके नाहीत. माहे जानेवारी २०२६ मध्ये ऐतिहासिक राजवाडा व दिल्ली वेस यांची दुरावस्था झाल्याचे व स्मारकाचा काही भाग क्षस्तीग्रस्त झाल्याचे श्रीगोंदा नगरपरिषद यांनी पुरातत्व विभागीय कार्यालय, नाशिक यांना अवगत केले आहे. त्यानुसार पुरातत्व विभागीय कार्यालय, नाशिक यांनी पुरातन दिल्ली वेस या स्मारकाबाबत श्रीगोंदा नगरपरिषद यांना त्यांच्या स्तरावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पुरातत्वीय संकेतानुसार डागडुजी करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.

पुरातन दिल्ली वेस हे स्मारक राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. सदर स्मारक राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित झाल्यानंतर पुरातत्व विभागाच्या नियमित निधीमधून सदर स्मारकाचे जतन व संवर्धन करणे शक्य आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चांदपूर (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील 'ग्रीन व्हॅली' पर्यटनस्थळाचा विकास करणेबाबत

**(२०)** * **८२१३ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यातील चांदपूर येथील 'ग्रीन व्हॅली' हे पर्यटनस्थळ महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे हस्तांतरित करण्यात आले असून, त्यानंतर सदर पर्यटन स्थळाचा नियोजित व अपेक्षित विकास न होता तसेच पर्यटनस्थळावर शैक्षणिक सहलींसाठी आवश्यक सुविधा, पर्यटकांसाठी मूलभूत सोयी अंतर्गत रस्ते, स्वच्छता, पिण्याचे पाणी, प्रकाश व्यवस्था तसेच सुरक्षिततेच्या सुविधा अपुऱ्या असल्यामुळे पर्यटकांची संख्या घटत असून स्थानिक पर्यटन व्यवसायावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जंगल सफारी, जलतरण प्रशिक्षण व निसर्ग पर्यटनासाठी उपयुक्त असलेल्या 'ग्रीन व्हॅली' पर्यटनस्थळाचा विकास रखडल्यामुळे उपलब्ध पायाभूत सुविधा व आधी खर्च झालेल्या शासकीय निधीचा अपेक्षित उपयोग होत नसून अप्रत्यक्षपणे शासकीय निधीचा अपव्यय झाल्याचे तसेच पर्यटनस्थळाच्या विकासासाठी संबंधित यंत्रणांमध्ये समन्वयाचा अभाव, स्पष्ट विकास आराखड्याचा अभाव अथवा निधीवाटपातील अडचणी यामुळे कामे प्रलंबित राहिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून, चौकशीच्या अनुषंगाने 'ग्रीन व्हॅली' पर्यटनस्थळाचा विकास होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई :** (१) व (२) हे खरे नाही.

चांदपूर ता.तुमसर, जि.भंडारा येथील "ग्रीन व्हॅली" करीता ०.५३ आर. क्षेत्रफळ इतकी जागा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास प्राप्त झाली आहे. सदर ठिकाणी पायाभूत सोई-सुविधा (पर्यटक स्वागत केंद्र, संरक्षित भिंत, पदपथ अंतर्गत रस्ते, बागबगीचा व इतर) निर्माण करण्यात आल्या असून पर्यटकांना या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील ऐरोली जकात नाक्यावर कोट्यवधी रुपयांचे प्रतिबंधित पानमसाला, गुटखा व तंबाखुजन्य पदार्थ जप्त केल्याबाबत

**(२१) * ८३८६ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विक्रोळी पोलीस ठाण्याच्या हददीतील ऐरोली जकात नाक्यावर परिमंडळ ७ मधील पोलीसांनी १४ वाहनांतून मुंबईत आणला जाणारा रुपये २ कोटी १४ लाख एवढ्या किमतीचा प्रतिबंधित पानमसाला जप्त केला असल्याचे तसेच यावेळी ३ आयशर ट्रक, १० वाहने व १ कारसह एकूण १४ वाहने आणि १० जणांना ताब्यात घेतले असल्याचे दिनांक १२ जानेवारी,२०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत प्रशासनाच्या दुर्लक्षाने विविध मार्गाने प्रतिबंधित गुटखा, पानमसाला इ.ची वाहतूक करण्यात येत असून बऱ्याचदा तो जप्त होऊनही या गुन्हयातील सुत्रधारापर्यंत यंत्रणा पोहचत नसल्याने सदरील गुन्हे वारंवार घडत असून याबाबत शासनाने कार्यवाही केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गुन्हयांना आळा घालण्यासाठी दोषींवर संघटीत गुन्हेगारी (मोका) कायद्याखाली कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक ०८/०१/२०२६ रोजी प्रतिबंधित पानमसाला, गुटखा व तंबाखुजन्य पदार्थ मुंबई शहरात विक्रीसाठी आणले जात असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर जुना जकात नाका, ऐरोली टोलनाका, मुलुंड पुर्व, मुंबई येथे सापळा रचून रुपये २ कोटी १४ लाख किमतीचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखुजन्य पदार्थ जप्त करण्यात आला. सदर प्रकरणी एकूण १४ वाहने जप्त करण्यात आली असून त्यामध्ये ०३ आयशर ट्रक, १० छोटी मालवाहतूक वाहने व एक कार इ. समावेश आहे. सदर प्रकरणी १२ आरोपींना अटक करण्यात आली असून अन्न सुरक्षा अधिकारी यांचे फिर्यादीवरुन दिनांक ०८/०१/२०२६ रोजी गु.र.क्र.१२/ २०२६ भान्यासं- २०२३, कलम २७४, २७५, १२३, ३ (५), अन्नसुरक्षा व मानके कायदा - २००६, २६ (२)(IV), ३७(३)(D), ३०(२)(१), ५९, ६३ अन्वये विक्रोळी पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद आहे. सदर प्रकरणी ०३ पाहिजे आरोपीचा शोध सुरु असून सर्व आरोपींविरुध्द बीएनएसएस,कलम १२६ अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात येत आहे.

(२) मुंबई शहरात प्रतिबंधित पानमसाला व गुटखा यांच्या विरोधात सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. तथापि, काही व्यक्ती अवैधरीत्या व छुप्या चोरीच्या मार्गाने प्रतिबंधित गुटखा व पानमसाल्याची वाहतूक व

विक्री करण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांवर अंकुश ठेवण्यासाठी मुंबई पोलीसांकडून नियमित तपास, छापे तसेच प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येते.

मुंबई शहरात सन २०२४ ते फ़ेब्रुवारी २०२६ पर्यंत प्रतिबंधित गुटखा वाहतूक तसेच विक्री प्रकरणी एकूण १६०८ कारवाया व एकूण २४१८६ पानटपरींवर कारवाई करण्यात आली आहे.

अशा प्रकारे प्रतिबंधित गुटखा व पानमसाल्याच्या विक्री व वितरणावर नियंत्रण ठेवण्यासाठी मुंबई पोलीसांकडून सातत्याने कारवाई करण्यात येत आहे.

(३) सध्या उपलब्ध नोंदीनुसार मुंबई शहरात प्रतिबंधित गुटखा प्रकरणांमध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) अंतर्गत कारवाई करण्यात आलेली नाही.

तसेच, महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) अन्वये कारवाई करण्यासाठी संबंधित आरोपींच्या एकत्रित रित्या केलेल्या गुन्ह्यांचा अभिलेख, पूर्व इतिहास तसेच इतर संबंधित माहितीची पडताळणी करण्यात येत असून त्यानुसार पुढील योग्य ती कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर येथील मुकुंदवाडी चौकात दोन तरुणांना पोलीस अंमलदारांनी मारहाण केल्याबाबत

**(२२) * ८३७२ श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथील मुकुंदवाडी चौकात दिनांक २१ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान मध्यरात्री पान शॉपसमोर उभ्या असलेल्या दोन तरुणांना त्यांच्याकडील दुचाकी चोरीची असल्याच्या संशयावरून पोलीस अंमलदारांनी उक्त तरुणांना रस्त्यावरच लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेचा सीसीटीव्ही फुटेज सोशल मीडियावर प्रसिद्ध झाला असून संबंधित दोन तरुणांपैकी एका तरुणास गंभीर दुखापत होईल इतकी मारहाण करण्यात आल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने सखोल व निष्पक्ष चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत काय, तसेच चौकशीअंती दोषी आढळून आलेल्या पोलीस अंमलदारांवर गुन्हा नोंद करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सदर गुन्ह्यातील फिर्यादी व त्यांच्या मित्र हे दोघे छत्रपती संभाजीनगर येथील मुंकुंदवाडी चौकात पानसेंटर जवळ मोटारसायकलने गेले त्याठिकाणी मुकुंदवाडी पोलीस स्टेशन येथे नेमणुक असलेले दोन अंमलदार उपस्थित होते. त्या पोलीस अंमलदारांनी फिर्यादी व त्यांच्या मित्राकडे असलेली मोटारसायकल चोरीची असल्याच्या कारणावरुन त्या दोघांना मारहाण व शिवीगाळ केल्याची घटना दिनांक २१/०१/२०२६ रोजी रात्रीच्या सुमारास घडली आहे.

(२) घटनास्थळावरील व्हीडीओ रेकॉर्डींग/ सीसीटीव्ही फुटेज जप्त करण्यात आले आहे. तसेच फिर्यादीस झालेल्या मारहाणीच्या अनुषंगाने वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. वैद्यकीय अहवालानुसार फिर्यादीस गंभीर दुखापत नाही.

(३) फिर्यादीस झालेल्या मारहानीच्या अनुषंगाने मुकुंदवाडी पोलीस स्टेशन, छ.संभाजीनगर येथे दिनांक २३/०१/२०२६ रोजी दोन पोलीस अंमलदारांविरुध्द गु.र.नं. ३९/२०२६, भा.न्या.सं. कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हा दाखल होताच दोन्ही पोलीस अंमलदारांना निलंबित करण्यात आले आहे, तसेच दिनांक २४/०१/२०२६ रोजी BNSS कलम ३५(३) अन्वये नोटीस देण्यात आली असून त्यांच्या विरुध्द प्राथमिक चौकशी सुरु करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील पोलिसांसाठी नवीन निवासस्थाने उपलब्ध करून देण्याबाबत

**(२३) * ८४१० श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलिसांसाठी सुमारे ४५ हजार नवीन शासकीय निवासस्थाने उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनामार्फत पोलीस गृहनिर्माण वसाहत प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून, शासकीय निवासस्थाने देण्याऐवजी मालकी हक्काची घरे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी पोलीस कुटुंबीयांकडून माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील विविध पोलीस वसाहतींमध्ये अनेक पोलीस कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय मागील ३० ते ३५ वर्षांपासून वास्तव्यास असून, त्यांच्या वेतनातून दरमहा सुमारे १५ ते १८ हजार रुपये भाडे वजा केले जात असतानाही बहुतांश घरे १०० ते २५० चौरस फूट इतक्या मर्यादित क्षेत्रफळाची असल्याने कुटुंबांना गैरसोयीचा सामना करावा लागत असून निवृत्तीनंतर घरे रिकामी करावी लागत असल्याने संबंधित कुटुंबांची आर्थिक व सामाजिक परवड होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नायगाव व वरळी येथील प्रकल्पांच्या धर्तीवर मुंबई पोलिसांना मालकी हक्काची घरे उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) होय, अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे.

मुंबई शहरातील वाढत्या लोकसंख्येच्या व सुरक्षिततेच्या जबाबदाऱ्या विचारात घेऊन मुंबई पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांच्या करीता सेवा निवासस्थाने निर्माण करण्यासाठी पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्प राबविण्यात येणार आहे. यासाठी समिती नेमण्यात आली आहे.

शासन निर्णय, दिनांक ११/१२/२०२५ अन्वये मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यांकरीता सदनिकेचा प्रकार २ साठी ५० चौ.मी. चटई क्षेत्रफळ निश्चित करण्यात आले आहे.

तसेच मुंबई शहरातील पोलीस वसाहतीतील घरे पोलीस दलातील अधिकारी /कर्मचारी यांना मालकी स्वरूपात देता येतील काय याचा धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी व सर्व कायदेशीर तांत्रिक व आर्थिक बाबी तपासण्यासाठी शासन निर्णय क्र. पुनर्वि-१०२४/प्र.क्र.२८१/पोल-७, दिनांक ०१/०१/२०२६ अन्वये अ.मु.स.(गृह), गृह विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

-----------------

## महालक्ष्मी (मुंबई) येथील फ्रैंको इंडियन फार्मासिटीकल प्रा. लि. कंपनीच्या संचालकांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(२४)** * **८५७० श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फ्रैंको इंडियन फार्मासिटीकल कंपनी मर्यादित, महालक्ष्मी, मुंबई यांच्या संचालिका श्रीमती शाहीदा यांनी फसवणूक केल्याबाबत मुंबई गुन्हे शाखा युनिट ८ यांचेकडे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार नोंदविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीच्या मालकीच्या एकूण १० वितरकाना बक्षिस दिल्याचे कागदोपत्री दाखवून व जीएसटीची खोटी देयके तयार करुन शासनाचा महसूल बुडविण्याचा तसेच कंपनीला फसविण्याचा प्रयत्न केला असल्याचे चौकशी दरम्यान निष्पन्न झाले असूनही सदर प्रकरणी गुन्हा नोंद झाल्यानंतर १० वितरकाकडून त्यांचे नाव गुन्ह्यामध्ये समाविष्ट न करण्यासाठी पोलीस उपायुक्त व पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा युनिट ८ यांनी कोट्यवधी रुपयांची रक्कम घेतली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा युनिट ८ हे मागील आठ वर्षापासून आर्थिक गुन्हे शाखा,मुंबई येथे कार्यरत असून त्यांची शाखेतून बदली होत नाही,हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, संबंधित पोलीस अधिकारी खोट्या गुन्ह्याचा निपक्षपाती तपास न करता गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या अशा पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करुन त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यासंदर्भात व त्यांच्या संपत्तीची चौकशी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) फ्रैंको इंडियन फार्मासिटीकल प्रा. लि. कंपनीच्या फिर्यादी संचालकांनी दिनांक २८/०७/२०२५ रोजी दिलेल्या लेखी तक्रारीनुसार सदर कंपनीचे नुकसान करून एकूण रुपये १०३ कोटी रूपयांची फसवणूक केल्याप्रकरणी ०५ आरोपीतांविरुध्द दिनांक १७/०१/२०२६ रोजी आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई गु.र. क्र १३/२०२६ (एन. एम जोशी मार्ग पोलीस ठाणे, मुंबई गु.र.क्र. २७/२०२६) भा.दं.वि कलम ४२०, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(२) फिर्यादींनी त्यांच्या तक्रारीत वितरकांना बक्षिस दिल्याचे तसेच जीएसटी बील बनावट असल्याचा आरोप केलेला नाही तसेच सदर बाब अद्यापपर्यंत तपासात निष्पन्न झाली नाही. जीएसटी बीलाबाबत आणखी सखोल तपास करुन बनावट आढळून आल्यास कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे. तसेच ट्रान्सपोर्ट वेंडर्सने दिलेल्या कॅश स्वरूपातील कमीशनबाबत तपास सुरु आहे.

या प्रकरणी पोलीस उपायुक्त व पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, युनिट ८, यांनी कोणतीही रक्कम स्विकारली नाही, असे पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडून प्राप्त अहवालात नमूद आहे.
(३) संबंधित पोलीस निरीक्षक यांची आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई या पदावर दिनांक २१/०३/२०२१ रोजी नेमणूक झाली आहे. तद्नंतर संबंधित पोलीस निरीक्षक यांची आर्थिक गुन्हे शाखा कक्ष ८ येथे प्रभारी पदावर दिनांक २९/०५/२०२५ रोजी नेमणुक झाली आहे.
(४) फ्रैंको इंडियन फार्मासिटीकल प्रा. लि. कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर यांचा गुन्ह्यातील मुख्य आरोपीत यांच्याशी विवाह झाला होता.तसेच सदर कंपनीमध्ये मुख्य आरोपीत यांची दिनांक ०१ नोव्हेंबर, २०१७ रोजी सिनियर मॅनेजिंग ॲडमिनिस्ट्रेशन या पदावर नेमणूक झाली होती व त्या या पदावर दिनांक १७ जानेवारी, २०२३ पर्यंत कार्यरत होत्या.

सदर प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीदरम्यान असे निदर्शनास आले की, सदर कंपनीत काम करत असताना मुख्य आरोपीत व त्यांचा भाऊ यांनी कंपनीच्या कार्पोरेट गिफ्टींग वेंडर्सशी परस्पर संपर्क केला. आरोपीतांस वेंडर्सनी कमीशन दिल्यास वेंडर्सच्या व्यवसाय वाढीचे आश्वासन आरोपीतांनी दिले. मुख्य आरोपीतांनी त्यांचे नातेवाईकांना गिफ्टींग वेंडर्सकडून कमीशन मिळवण्याकरीता फ्रैंको इंडियन फार्मासिटीकल प्रा. लि. कंपनीकडून गिफ्टींग वेंडर्सला बीलामधुन सुमारे १०३ कोटी रूपये अतिरिक्त रक्कम अदा करण्यास व गिफ्टींग वस्तुंच्या खरेदीस मंजुरी मिळविण्यास मदत केली. गिफ्टींग वेंडर्सना अदा केलेली रक्कम कमीशन स्वरूपात प्राप्त करण्यासाठी, मुख्य आरोपीत यांनी त्यांची मुलगी व आई या भागीदार असलेल्या २१२ एंटरप्रायजेस या फर्मची स्थापना करून सदर फर्मच्या बँक खात्यावर रुपये १०२ कोटी तसेच मुख्य आरोपीत यांचे भाऊ व मुलगी यांच्या बँक खात्यावर सुमारे १ कोटी रूपये रक्कम स्विकारली.

नमूद गुन्हयातील आरोपींनी फसवणुकीच्या रकमेतून घेतलेल्या मालमत्तेची माहीती मिळण्याकरीता आर्थिक गुन्हे शाखेकडून जिल्हा सह निबंधक, पुणे व जिल्हा सह निबंधक, मुंबई यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तसेच आरोपींनी फसवणूकीच्या रकमेतून मालमत्ता विकत घेतली आहे किंवा कसे हे निष्पन्न करण्याकरीता संबंधित बँकेकडून काही बँक स्टेटमेंट प्राप्त करण्यात आली आहेत. फिर्यादीच्या कंपनीचे मिनीट्स, नोट्स व इतर माहीती प्राप्त करण्याकरीता आर.ओ.सी. कार्यालयाशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. व्हेंडर कंपनीचे प्रोपायटर/संचालक यांचे जबाब नोंदविण्यात येत आहेत. कंपनीतील कामाकरीता व्हेंडरची निवड करणे तसेच बील मंजूर करणे यासंबधी आरोपीस कंपनीतील १ संचालक, १ कर्मचारी यांनी मदत केली आहे काय याबाबत पुरावे गोळा करण्याकरीता त्यांचे जबाब नोंद केले आहेत. या प्रकरणी कंपनीतील आणखी संबंधित कर्मचारी यांच्या सहभागाची माहिती घेण्यासाठी कागदोपत्री पुरावे गोळा करण्याचे काम सुरु असून सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-अहमदाबाद महामार्गावर वाहन चालकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक प्रतिबंधात्मक सूचना फलक व दिशादर्शक चिन्हे बसविण्याबाबत

**(२५) * ८६१५ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद महामार्गावर वाहन चालकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक प्रतिबंधात्मक सूचना फलक व दिशादर्शक चिन्हे अनेक ठिकाणी नसल्याने वाहतूक कोंडीच्या वेळी काही वाहन चालक विरुध्द दिशेने प्रवास करीत असून वाहतूक पोलिसांकडून त्याकडे दुर्लक्ष होत असल्याच्या लेखी तक्रारी प्राप्त झाल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गावरील अपघातांच्या घटनांत वाढ झाली असून, मालजीपाडा ते वर्सोवा दरम्यान तसेच मुंबई व ठाणे हद्दीत वाहतूक कोंडीच्या वेळी अनेक वाहन चालक ससूनघर उड्डाणपुलाखालून वळण घेत विरुध्द दिशेने प्रवास करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिरसाड ते विरार फाटा, बावखळ ते पेल्हार, सोपारा फाटा ते वसई फाटा तसेच वसई फाटा ते सातिवली या दरम्यान अवजड वाहनांसह इतर वाहने विरुध्द दिशेने प्रवास करीत असल्याच्या पार्श्वभूमीवर अपघात टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, सूचना फलक उभारणी, वाहतूक नियंत्रण व कारवाईबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) दिनांक ५ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास अशा स्वरुपाची लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.

वाहन चालकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक ती प्रतिबंधात्मक सूचना फलके व दिशादर्शक चिन्हे लावण्यात आलेली आहेत. तसेच मुंबई -अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर वाहन चालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने वाढीव सूचना फलक व दिशादर्शक चिन्हे लावणे व इतर वाहतुकीची समस्या निर्माण होऊ नये याकरीता आवश्यक त्या उपाययोजना करण्याकरीता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांना वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

सदर महामार्गावर सुरळीत वाहतूक नियमनाकरीता वाहतूक पोलीसांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांच्या मार्फत मालजीपाडा ते वर्सोवा दरम्यान ससून उड्डाणपूलाखालून कोठेही विरुध्द दिशेने वाहने जाऊन वाहतूक कोंडी होणार नाही याची काळजी घेतली जाते व वाहन चालक विरुध्द दिशेने प्रवास करताना आढळून आल्यास वाहतूक नियमाचे उल्लंघन करणारे वाहन चालकांवर वाहतूक शाखेमार्फत मोटार वाहन कायदा अन्वये दंडात्मक कारवाई केली जाते.

(३) शिरसाड ते विरार फाटा, बावखळ ते पेल्हार, सोपारा फाटा ते वसई फाटा तसेच वसई फाटा ते सातिवली दरम्यान अवजड वाहनांसह इतर वाहने विरुध्द दिशेने प्रवास करीत असल्या प्रकरणी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालया अंतर्गत वाहतूक शाखेने सन २०२५ मध्ये एकूण ४३५ केसेस दाखल केले आहेत तर दिनांक ०१/०१/२०२६ ते दिनांक ११/०३/२०२६ या कालावधीत ३०९ केसेस दाखल करुन कारवाई केलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील रडार इंटरसेप्टर वाहनांचा वापर करण्यात येत नसल्याबाबत

**(२६) * ८१३४ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रस्ते सुरक्षित करण्यासाठी खरेदी करण्यात आलेली ६९ रडार इंटरसेप्टर वाहने प्रत्यक्ष वापरात न आणता सुमारे तीन महिने विनावापर पडून असून ही वाहने वापरात न आल्यामुळे वाहतूक नियमांची अंमलबजावणी प्रभावीपणे न होणे, वेग नियंत्रणात अडचणी येणे तसेच अपघात प्रतिबंधासाठी आवश्यक असलेली यंत्रणा निष्क्रिय राहणे अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ६९ रडार इंटरसेप्टर वाहने तीन महिने विनावापर पडून राहिल्यामुळे शासनाला दंड वसुली, वाहतूक महसूल तसेच सार्वजनिक सुरक्षेशी संबंधित बाबींमध्ये किती आर्थिक नुकसान किंवा महसूल तोटा झाला आहे, तसेच ही वाहने वेळेत वापरात न आणण्यामागे परिवहन विभागातील नियोजनातील त्रुटी,

प्रशासकीय विलंब किंवा निष्काळजीपणा कारणीभूत आहे काय, तसेच यासाठी जबाबदार अधिकारी किंवा यंत्रणांवर कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घटनेच्या कारणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच खरेदी केलेली यंत्रणा दीर्घकाळ विनावापर पडून सार्वजनिक निधीचा अपव्यय होऊ नये यासाठी शासनाने कोणती ठोस कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक एमव्हीडी-०३२३/प्र.क्र.९६/परि-४, दिनांक २१/०८/२०२४ अन्वये गृह (परिवहन) विभागाच्या अधिपत्याखालील कार्यरत वायुवेग पथकांसाठी ६९ नवीन इंटरसेप्टर वाहने व सदर वाहनांवर रडार आधारित अत्याधुनिक उपकरणे (Vehicle Top Mounted Radar Device) बसविणेकरीता प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार परिवहन आयुक्त कार्यालयाकडून ६९ वाहनांवर बसविण्यात येणाऱ्या रडार आधारित अत्याधुनिक उपकरणांची खरेदी करण्याकरीता निविदा प्रक्रिया करण्यात येऊन दिनांक १४/१०/२०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले.

प्रस्तुत प्रकरणी सर्व तांत्रिक प्रक्रिया पार पाडल्यानंतर व सर्व अनुपालन कागदपत्रे सादर केल्यानंतर ई-चालान कामकाजाला डिसेंबर, २०२५ मध्ये सुरुवात करण्यात आली. दरम्यानच्या काळात सदर वाहनांद्वारे अंमलबजावणी विषयक व रस्ता सुरक्षाविषयक दंड वसुली व इतर अनुषंगिक कामकाज सुरु होते.

सद्य:स्थितीत सदर रडार आधारित इंटरसेप्टर वाहनांद्वारे रस्ता सुरक्षाविषयक, मोटार वाहन कायदाविषयक उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर ई-चालान जारी करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा प्रकल्पाला निधी उपलब्ध करुन देणेबाबत

**(२७)** * **८४५८ श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जागतिक पर्यटन स्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या युनेस्को दर्जा प्राप्त वेरुळ व अजिंठा लेण्या, ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले घृष्णेश्वर मंदिर, प्राचीन बौध्द लेण्या, तसेच जागतिक दर्जाचे नैसर्गिक वारसा स्थळ असलेले लोणार सरोवर यांसारखी ऐतिहासिक, धार्मिक व नैसर्गिक वारसा स्थळे असून, सदर नैसर्गिक वारसा स्थळांचा सर्वांगीण विकास करून पर्यटन वाढीस चालना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिसरामध्ये पर्यटन विकासासाठी शासनाच्या आराखड्यामध्ये कोणत्या बाबींचा समावेश आहे, तसेच ऐतिहासिक संग्रहालय, संत साहित्य गॅलरी, नाथ संप्रदाय अभ्यास व सांस्कृतिक केंद्र, मराठवाडा मुक्ती संग्राम स्मारक, संशोधन केंद्र, वारसा उद्यान, पर्यटक सुविधा केंद्र तसेच शाश्वत पर्यटन डिझाइन यांचा समावेश असलेला एकात्मिक विकास आराखडा तयार करून त्यास मंजुरी देऊन सुमारे रुपये

१५० कोटी निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ऐतिहासिक धार्मिक व नैसर्गिक वारसा स्थळांचा सर्वांगीण विकास करण्याबाबतचा प्रस्ताव कोणत्या टप्प्यावर प्रलंबित असून उक्त प्रकरणी शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे अंशत: खरे आहे.

पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे आणि अवशेष अधिनियम १९६० व नियम १९६२ च्या अंतर्गत राज्य संरक्षित स्मारकांचे जतन व संवर्धन कार्य हे सांस्कृतिक कार्य विभागामार्फत केले जाते. उक्त प्रश्नातील स्मारके ही राज्य संरक्षित स्मारके नसून केंद्र संरक्षित स्मारके आहेत. सदर स्मारकांवर पर्यटन विकास करणे ही बाब केंद्र शासनाच्या सहकार्याने पर्यटन विभागाकडून केली जातात.
(२) हे खरे आहे.
(३) जानेवारी २०२६ मधील पत्राच्या अनुषंगाने सांस्कृतिक कार्य विभागाशी संबंधित मुद्द्यांबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयांना अवगत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.